# 'माझ्या' कविता

दहावी अकरावी पासून तर नक्कीच मी खूप सिरिअसली कविता वाचतोय

एप्रिल २०२० मध्ये ' What really matters ' या बद्दल विचार करायला वेळ मिळाला

त्यामध्ये माझं एक नक्की आणि ठाम उत्तर कविता हे होतं .

गेल्या जवळजवळ तीस वर्षात मला सगळ्यात जास्त आवडलेल्या , भावलेल्या , घुसलेल्या , छळलेल्या , वेड लावलेल्या आणि नादावलेल्या या कविता.

तुमचा

शैलेश

http://www.shaileshdeshpande.in/


मारवा
कुसुमाग्रज
रसयात्रा
कुसुमाग्रज
पक्ष्यांचे ठसे
सुधीर मोघे
रंग माझा वेगळा
कविता: विसाव्या शतकाची
संपादक: शान्ता ज. शेळके, प्र.ना. परांजपे, वसंत आबाजी डहाके, नीलिमा गुंडी
ध्रुपद
विंदा करंदीकर
गोलपिठा
कवितांच्या गावा जावे
एकूण कविता-१
विशाखा
कुसुमाग्रज
जातक
विंदा करंदीकर
बोरकरांची निवडक कविता
पक्ष्यांचे लक्ष थवे
ना. धों. महानोर
सुहृद्गाथा
मर्ढेकरांची कविता
भालचंद्र नेमाडे
देखणी
गर्भरेशीम
इंदिरा
अखेरची वही
एकूण कविता - २
"मी माझा"
सकीना
वसंत बापट
ना. धों. महानोर
रानातल्या कविता
संध्यापर्वातील वैष्णवी
ग्रेस
संध्याकाळच्या कविता
महाकवि श्रीकालिदासाचे
॥मेघदूत॥
शान्ता ज. शेळके
शततारका / वसंत बापट
दर्शन
शंकर वैद्य
दिवेलागण
कल्लोळातला एकांत
अजीम नवाज राही
कविता शतकाची
जावे जन्माकडे
अरुणा ढेरे
इत्यादी, इत्यादी
जेजुरी अरुण कोलटकर
नवा दिवस
निवडक
नारायण सुर्वे
निवडक वसंत आबाजी डहाके
अस्वस्थ शतकाची कविता
प्रीतरंग
विद्रोही कविता
ना. धों. महानोर
पावसाळी कविता
समग्र
केशवसुत

...एखादी उत्तम कविता जेंव्हा मी वाचतो किंवा श्रवण करतो तेंव्हा तिच्या जबरदस्त प्रभावाने मी हादरून जातो .
अशा सर्वांगसुंदर रचनेला शरण जातो. तिच्या निर्मितीप्रक्रियेविषयी विचार करीत राहतो.

अश्या कविता किंवा कलाकृती मला जगण्याची भाषा शिकवतात , प्रेरणा देतात, हिम्मत वाढवतात.
संस्कार व सामर्थ्य देतात. माझ्या मानसिक कक्षा रुंदावतात.

प्रचंड घोटाळे घालून बसलेल्या या भयानक अंधकारात कुण्या कवीने,रचनाकाराने लहानसा मिणमिणता दिवा आपल्या हाती ठेवावा तसे मला वाटते.

एक आधार मिळतो. हा आधार मित्रासारखा असतो. पत्नीसारखा असतो. किंवा वाडवडिलांनी ठेवलेल्या प्रगत अनुभवी वारश्यासारखा असतो

संपूर्ण जीवनाला ढवळून काढणाऱ्या नव्या सत्यासमोर नेऊन ते मला उभे करतात.
माझ्यातला तुटकेपणा जोडून देतात ...

नारायण सुर्वे

या संकलनाच्या मी दोन आवृत्त्या बनवल्या आहेत एक 'छोटी' ज्या मध्ये प्रत्येक कवीच्या कमीत कमी कविता निवडल्या आहेत

दुसरी , ' संपूर्ण ' ज्या मध्ये मला आवडलेल्या सगळ्या कविता आहेत

ही छोटी आवृत्ती आहे . संपूर्ण आवृत्तीसाठीची लिंक माझ्या वेबसाइट वर मिळेल.

हे संकलन बनवण्या मागे या कवितांचा आनंद share करणे हा हेतू तर आहेच, पण एक मोठी आशाही आहे की तुम्हीही 'तुमच्या' कविता मला पाठवाल :)

जसं शक्य होईल तसं हे संकलन अजून वाढवण्याचा ही प्लॅन आहे

तुमचा

शैलेश

shaileshdesh@gmail.com

www.shaileshdeshpande.in

**[www.shaileshdeshpande.in](http://www.shaileshdeshpande.in)**

# सुभाष अवचट

स्टॉलच्या दाराबाहेर पावसात निथळत उभा ट्रक
भिंतीपाशी तिरकी कोलमडलेली गंजकी सायकल
स्टॉलच्या आत तोंड घालत, ओली बेवारशी गाय
फडफडणाऱ्या निळ्या प्लॅस्टिकमधून ओघळणारी
चुकून धार
छत्र्या सांभाळत ये-जा करणारे, पायजमे सावरत गावकरी
घोंगडीत गुरफटून उबेत शेजारी बसलेला आंधळा,
छपरावरच्या पावसाच्या आवाजात मिसळत गेलेला स्टोव्हचा आवाज
कढईवर हात उंच करून भजी तळणारी स्टॉलवाल्याची
खमंग बायडी
तिच्या काखेतून, येणाऱ्या स्टोव्हच्या पिवळ्या प्रकाशाची
किनार लागलेला, खालीवर होणारा उजवा पुष्ट स्तन
सारेच ओलसर-
भाजल्या मक्याच्या कणसाच्या दुरून येणाऱ्या वासासारखा,
एक एक गरम दाणा ओठात घ्यावा असा
बदमाश अधांतरी ही वेळ, दारातल्या पावसाच्या पडद्यात हायवे स्टॉलमधला-

खंडाळा/हायवे/ऑगस्ट २००३

# सौमित्र ( किशोर कदम )

**नटराजाला प्रार्थना : सौमित्र**

आसपास असू दे भारलेला
नाटकाचं पहिलं वाचन ऐकण्या आधीच
शरीराभोवती माझ्या
अनोळखी खळबळुदे सळसळुदे काही

का ? कोण ? कशासाठी ? कुठवर ?
अश्या अनेक प्रश्नांसोबत
वाचनात कंसानी साऱ्या घेउदेत कवेत आपोआप

शिरताना रिहर्सलच्या घनदाट अरण्यात
घड्याळाचे काटे अडकू देत एकमेकात
रिकाम्या खिशाची पोकळी विसरू दे घराचा चौकोन
राहू दे सारं उभं आठवण्यापल्याड अरण्याच्या

धावू दे शोधत मृगजळ
एक तरी ठिकाण सापडू दे रोज नवं

प्रयोगाआधी  नेहमी ध्यानस्थ मिळू दे थिएटर
गर्भागारात त्याच्या फिरता येऊ दे अपार
जाणून घेता येऊ दे त्याचा गडद अंधार

तडकलेले नसू देत आरसे कधीच ,
आहे तसाच चेहरा दिसू दे
चिकटू दे दाढी मिशी उगवल्यागत
रिहर्सलचा काळ तप होऊन पाठीशी उभा राहू दे

पहिल्या घंटे आधीच एकाग्र होऊ देत केंद्र सारी
एकांत माझा प्रकाशमान होऊ दे

प्रयोगात, पात्रांसकट गात्र सारी पहाटफूल होऊन उमलूदेत
स्पर्शाला फुटू दे  पालवी , नाकाला सुगंध दिसू दे
जिभेला होऊ दे शब्द , अर्थ लाळेत भिजून जाऊ दे
ओलेचिंब होऊ देत पॉजेस सारे

राहू दे ओंकार वाणीत ,
आणि पाणी होऊन हालचाली साऱ्या सहज वाहू देत
शंभराव्या प्रयोगाची मांड पहिल्यातच बसू दे

फुटू दे तरी इंद्रधनुष्य नवीन प्रयोगाप्रयोगी
एक तरी क्षण जिवंत होऊ दे
असू दे भान सतत जागं
माझं मलाच विंगेतून पाहता येऊ दे

प्रयोगानंतर ओहटु दे लवकर नेणिवेचा सागर
दिपवु नकोस डोळे अंधारातून प्रकाशात

जगण्याच्या गदारोळात सहज मिसळता येऊ दे
रस्ता  आणि पाय दोन्ही मला आवडू दे
शेवटी माझा मला मी पुन्हा एकदा सापडू दे

**संदीप खरे**

मी आणि माझा आवाज - एकत्रच रहायचो पूर्वी आम्ही ,
जिवलग होतो दोघे , मी आणि माझा आवाज

आता मी एका घरी राहतो , तो दुसऱ्या घरात.

पूर्वी कसं , सगळं बरं होतं , सगळं आरपार खरं होतं
ढग दाटले , की गुदमरायचो मी आणि दाटून यायचा माझा आवाज

सूर्य मावळताना मी घुसमटायचो , आणि फाटून जायचा आवाज

सर कोसळताना मलाही हिशेब नसायचा उद्याचा ,
आणि त्याचाही पिसारा थर थर फुलायचा, जणू मोर !

कोणाशी वाईट वागताना कानकोंडं व्हायचं मला ,
आणि त्याच्याही काळजात कुजबुजायचं 'चोर' !

एकत्रच रहायचो पूर्वी आम्ही , जिवलग होतो दोघे

पुढे काय झालं , की त्याला काही न सांगताच परस्पर करार केले मी जगाशी

मला माती जमवून घर बांधायचं होतं जमिनीशी ,
त्याला प्रार्थना करून पोहोचायचं होतं ढगांशी

त्याचं खरं होतं म्हणा , पण माझंही नव्हतं खोटं ,
त्याला इमान जपायचं होतं , पण मला पोसायची होती पोटं

त्याला पटलं नाही, पण मदतच करत आला तो मला ,
चिडायचा , पण अडायचा नाही

तो होताच मुळात भला,
पण कळलेच त्याला पुढे ,की माझा मोह काही संपायचा नाही

मग , स्वरयंत्रातून ध्वनी पाठवू लागला तो, स्वतः यायचाच नाही

मग एका टाळ्यांच्या प्रदर्शनात आमचं फाटलंच.
मी म्हटलं : मला महान वाटतं आहे ,
तो म्हणाला , मला वाटलंच !

आणि , मग गेलाच तो ,
दूर नाही , माझ्याच आत, खोल खोल

माझ्याच आत बांधून घर , म्हटला - हां , आता इथे येऊन बोल

एकत्रच रहायचो - मी आणि माझा आवाज
आता मी एका घरी राहतो , तो दुसऱ्या घरात

आताशा, घरी काही कार्य निघालं , की भिती वाटते त्याला निमंत्रण द्यायला
कुणास ठाऊक , तो येईल न येईल ,
माझ्या घरात चाललंय, त्यात भाग घेईल कि न घेईल ,

धास्ती वाटते , की कळेल लोकांना ,
की इतक्या आतून तो येईल , इतकी माझी पुण्याई नव्हे
की मी म्हणजे माझा आवाज नाही आणि माझा आवाज म्हणजे मी नाही

## आता वाटतं की

आता वाटतं की नऊ नऊ महिने घेणार एक एक शब्द यायला
आता वाटतं भरभरून द्यावसं वाटावं, असं नाहीच काही द्यायला
एका भाबड्या प्रामाणिकपणे सारंच मांडत आलो इतके दिवस
आता वाटतं – नको होतं सारं इतक्या लग्बगीने सांगायला
आता वाटतं की आपल्या हयातीत उणावणार नाही हा दुष्काळ,
कसे सचैल भिजायचो इतके दिवस – मजा वाटते आहे !
काही देणार नाही असा शब्दच वाटत नाही लिहावासा
अस्वस्थ वाटते आहे, लेखणीची भीती वाटते आहे ...
आता वाटते इतका अधाशीपणा नको होता करायला
थोड्या धीराने घेतलं असतं, तर उरलीही असती श्रीशिल्लक काही
आता परत काही नवे वाटून घेण्यासाठी नवा प्रवास
प्राणात खोल शोधतोय त्राण; गवसत नाही !
भरून आला होतात काठोकाठ त्या मेघांनो – क्षमा !
बहरून आला होतात त्या उद्यानांनो – क्षमा !
झाली असेल कुचराई एखादा थेंब झेलण्यात, फूल खुडण्यात
पण त्यासाठी इतकी शिक्षा फार होते आहे !
पक्षी कुठेही उडत असो, क्षितिजाकडेच उडत असतो
यावर आता विश्वास ठेवायचा फक्त ...
हाताची घडी घालून, शांतपणे मिटायचे डोळे
थंड झालं तर पाणीच होतं म्हणायचं,
आणि उसळलंच तर म्हणायचं रक्त !

## राधे रंग तुझा गोरा.

राधे रंग तुझा गोरा, सांग कशाने रापला...
मिठीतुन सावळ्याच्या, रंग सावळा लागला..

राधे कुंतल रेशमी, सैर भैर ग कशाने..
उधळले माधवाने किंवा नुसत्या वाऱ्याने..

राधे दृष्टीतून का ग, घन सावळा थिजला..
इथे तुझ्या डोळा पाणी, तिथे मुरारी भिजला..
राधे रंग तुझा गोरा, सांग कशाने रापला

डोळा पाणी जिणे उन्ह, इंद्रधनुचा सोहळा..
पुसटले साती रंग, एक श्रीरंग उरला..
राधे रंग तुझा गोरा, सांग कशाने रापला

मिठीतुन सावळ्याच्या, रंग सावळा लागला..
राधे रंग तुझा गोरा, सांग कशाने रापला

- संदीप खरे.

वैभव जोशी

देव कुठं आहे?

पूर्वी कसं की तू दिवसाच्या कुठल्याही प्रहरी

एखाद्या वडापिंपळाखाली पडीक असायचास,

देव नाही, फकीर वाटायचास,

दगडी नाही, जिवंत दिसायचास।

येता जाता लोक तुझ्या शेजारीच घडीभर विसावायचे,

शिदोरी उघडून दोन घास स्वतः खायचे,

दोन घास तुला द्यायचे.

म्हणजे कसं की देवाणघेवाण असायची

म्हणजे कसं की एक आदानप्रदान असायचं।

तसं तर तेव्हाही तू शेंदरी रंगाचे वैगरे डगले घालायचास,

पण कसं की वेषांतर केलेला राजा वाटायचास,

थेट प्रजेत मिळून मिसळून वावरायचास,

कसं की त्या निमित्ताने तुझ्याही कानावर यायचा रयतेचा हालहवाल,

आमचं सुखदु:ख हाच तुझा अबीर गुलाल।

म्हणजे कसं की तुझ वेगळेपण तेव्हाही लपून राहायचं नाही,

पण कसं की आपुलकीच्या निर्झरातून कोरडेपण वाहायचं नाही,

कधीही बघू शकायचो तुझ्या डोळ्याला डोळा भिडवून.

तुही सगळ्यांना सामावून घ्यायचास,

डोळ्यात तुझ्या 'मी' पण नव्हतं

म्हणजे कसं की ते मी पण आता तुझ्यात आलंय

असं मुळीच नाही म्हणायचय,

पण कसं की हल्ली भेटतच नाहीस मुळी उराउरी

म्हणजे मग एखाद्याने काय समजायचं।

म्हणजे कसं की विनोदीच होऊन बसलंय सगळं

बघ ना म्हणजे कसं की विनोदीच होऊन बसलंय सगळं

आपल्या दोघांनाही भेटीची ओढ आहे

मधलाच कुणीतरी मनावर घेत नाही,

आम्हाला आत जाता येत नाही

तुला बाहेर येता येत नाही।

की पूर्वी कसं की तू दिवसाच्या कुठल्याही प्रहरी

एखाद्या वडापिंपळाखाली पडीक असायचास,

देव नाही, फकीर वाटायचास,

दगडी नाही, जिवंत दिसायचास

तुलाही राजमहालात जायचं नसावं

पण तू राहायला गेलायेस हे मात्र खरं

मग आम्हीपण जरा बुजाल्यागत झालो

म्हटलं आपण बरं आपलं सुखदु:ख बरं

पूर्वी कसं की तू-आम्ही

म्हणजे कसं की राजा-रयत—हालहवाल

म्हणजे कसं की आमचं सुखदु:ख तुझा अबीर-गुलाल

म्हणजे कसं की निर्झर ओलावा

आता कसं की मिरवणूक देखावा

म्हणजे कसं की जयघोष कल्लोळ

म्हणजे कसं की देवस्थान मंडळ घोळ

पूर्वी कसं की तु-आम्ही-आपणच फक्त

आता कसं की डोळाभरून बघण्यावरही पहारा असतो सख्त

म्हणजे कसं की,

पूर्वी कसं की,

आता कसं की

थोडक्यात असंय बघ सगळं ||

पडद्यावर राष्ट्रगीत दिसते, उभे राहतो आम्ही
कोणी सुरुवातीला उठतो कोणी हळू हळू सावरतो,
सावधान समजत नाही विश्राम आठवत नाही,
मग लाजत लाजत आम्ही पुटपुटतो काही ओळी,
विब्रेशन वर थर थरतो मोबाईल त्याही वेळी,
कोणी आर्त मनाने गातो, आवाज वाढतो थोडा,
वळतात शेकडो माना हा कोण असावा वेडा,
जो सच्चा असतो त्याला वेड्यात काढतो आम्ही,
तो मुक होऊनी जातो मग पुढे पाहतो आम्ही.

हे सिंध कुठे आहे हो, उथ्कल की गुच्छल बंगा,
आधी यमुना येते ना की प्रयारेटीने गंगा,
कोणी लिहिले आहे हो बायको विचारत असते,
ताज्या वेफर्स चे पाकीट हातात कुरकुरत असते,
उत्सुकता पूर्ण शिगेला पिक्चर ची वेळा आली,
जय हिंद. होताच पटापट बसतो खाली.
छोटासा मुलगा कोणी म्हणतो आपल्या बापाला,
ही जाहिरात कोणती होती? विकली कोणी कोणाला..

तर कुरवाळत म्हणतो डॅडी my poor innocent
angel Anthem म्हणतात याला,
पण ही भारत वली जिंगल, भारत भारत भारत घोकले की
भारतीय होतो आम्ही...
पडद्यावर राष्ट्रगीत दिसते आणि फक्त उभे राहतो आम्ही...

# वसंत आबाजी डहाके

## २ : एक प्रकारची प्रार्थना

मी प्रार्थना करतो
या ग्रहासाठी, पृथ्वी नावाच्या या ग्रहासाठी
या ग्रहावरील साऱ्याच जायबंदी प्राण्यांसाठी
मी प्रार्थना करतो
या माझ्या देशासाठी
अंगावरच्या जखमा सांभाळत
कण्हत पडलेल्या माझ्या देशासाठी
मी प्रार्थना करतो जाळलेल्या घरांसाठी
उद्ध्वस्त वस्त्यांसाठी
निपचित पडलेल्या रस्त्यांसाठी
चिरडून टाकलेल्या कोवळ्या जिवांसाठी
पशूंसाठी
पक्ष्यांसाठी
कीटकांसाठी
गोठ्यातल्या गोठ्यात जळून गेलेल्या जनावरांसाठी
मी म्हणतो : माझ्या मनातल्या वेदना वेचून घे ईश्वरा
सगळ्यांच्या मनातल्या वेदना वेचून घे ईश्वरा
याच्या त्याच्या यातना वेचून घे ईश्वरा
माझ्या चित्ताला बरं कर देवा
सर्वांच्या चित्तांना बरं कर देवा
मी एक प्रकारची प्रार्थना करतो
या अस्ताव्यस्त आणि क्षणभंगुर युगात
मी एक समकालीन कवी प्रार्थना करतो
कसलाही भरवसा नसलेल्या काळासाठी
उद्याच्या दिवसाची खात्री नसलेल्या बाळासाठी
आमच्या माथ्यांवर कोसळू पाहणाऱ्या आभाळासाठी
ही नि:शस्त्र असहाय माणसं पानांसारखी थरथरणारी
आणि शस्त्रं परजीत धावणारे जमाव आगीच्या लोळासारखे
खळ्यातली कणसं
उखळातले दाणे
मी प्रार्थना करतो आकाशातून कोसळणाऱ्या मुसळांसाठी
घराघरात दडलेली भीती
रस्त्यांवरचे आकस्मिक धोके,
गिळून टाकणारी संदेहांची भुयारं
मी प्रार्थना करतो सहनशीलतेसाठी
शांत राहता यावं यासाठी
जनसामान्यांसाठी, सामान्यांच्या प्रतिनिधींसाठी
रस्त्यांवरच्या शिणलेल्या शिपायांसाठी
त्यांच्या हातांतल्या काठ्यांसाठी, बंदुकीच्या गोळ्यांसाठी
बापाच्या कडेवर बसून हसणारी पोर
आभाळात उगवलेली चंद्रकोर, हाडं हाडं निघालेलं मोकाट ढोर
मी प्रार्थना करतो
प्रार्थनेशिवाय दुसरं काहीही हातात नसलेल्या
असहाय कवींसाठी, लेखकांसाठी, त्यांच्या शब्दांसाठी
लाचार शेतकऱ्यांच्या कर्जाच्या अर्जांसाठी
मगरूर नोकरशाहीसाठी, रखडायला लावणाऱ्या लाल फितीसाठी
होयबांच्या घोळक्यांत बसलेल्या राजकारण्यांसाठी
त्यांचा वरदहस्त लाभलेल्या चेल्याचमच्यांसाठी
काट्यांचा मुकुट घातलेल्या नेत्यांसाठी,
उन्हातान्हात राबणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी
मी प्रार्थना करतो मायबहिणींसाठी, मुलांसाठी
आजच्या उद्याच्या फुलांसाठी, फुलांसारख्या मुलांसाठी
मी प्रार्थना करतो तुमच्यासाठी, यांच्यासाठी, त्यांच्यासाठी
साऱ्यांसाठी
सारे सुखी होवोत, सारे निरामय होवोत.

✧ ✧

# टाटा मेमोरिअल हॉस्पिटलमधून वावरताना

सगळ्या बोलल्या गेलेल्या गोष्टी झाल्या
(कंसातल्यादेखील)
आता डोक्यात चंद्र घेऊन उभं राहायचं
विठ्ठलासारखं, कमरेवर हात ठेवून.
नाहीतर विष्णूसारखं पडून राहायचं
पाण्यावर तरंगत.

चांदणं पाझरत राहील आत आत
सगळ्या नळ्यांमधून, सावकाश.
आपलं शरीर इथं सापडतं,
संतांना विठ्ठल सापडल्यासारखं.

आपल्या आतल्या रोगचिन्हांचा
सुगावा लागलेली माणसं
बसलेली असतात इथंतिथं,
गळलेल्या पानाफळांसारखी.
समोरच्या बंद दाराच्या पलीकडे पाहतात
किंवा कुठंतरी किंवा कुठंही नाही.
ती असतात
आपल्या काही गावी नसल्यासारखी,
मधेच कुठंतरी.

हलक्याफुलक्या अस्तित्वाचं वजन
असह्य होऊन जातं;
ज्ञानाची मजलदरमजल थकवा आणते;
आपण आपल्या आत
आपल्याच नाशाची बीजं
वागवत असतो,
हे कळतं.
यानंतर
काय कळायचं असतं.

■

# दिलीप पुरुषोत्तम चित्रे

## शक्तीची प्रार्थना

उलथून चक्रमय रात्रीची स्तब्धता
उघड स्वर्गीय तेजस्वी थडगी
एकदा मांस दिलेल्या थंडस्तनी पोरी
मूकगुप्त पाण्यागत एकदा संपूर्णलेल्या
स्त्री,

ह्या
आताच्या
अस्तंगत बाहुपाशात
पालथा कर
हा मुखस्तंभ प्रकाश
स्रव
शेवटला

काळोखा तारा
आणि गर्भाशय उघडून
घे खोलवर उलगडून
हा एकात्म
घरीदारीचा
निवांन्त निखारा
पुन्हा उघड
बंदिस्त ज्योतिश्चक्र
ज्यातून उगवला
माझ्या अस्तित्वाचा
ग्रह
उलथ, उलथ
तुझ्या अंगाचा
मुखस्तंभ उभारा
माझ्या अंगावर
संभार
ओणवा वणवा
अंगभूत
भस्म
ने वाहून माझ्या
त्वचेवर उमटलेली
स्पर्शजन्य प्रश्नचिन्हं
लाख
कर
तुझा दुर्बोध
प्राणविस्तार
माझ्यात
भार
माझी काळोखी पोकळी उभार कणा
अन् उत्स्फूर्त लिंग
हे चमत्कृती, हे चक्रमयी
ने महापूर माझ्या अंतर्वळणी अंगातून
हे भ्रमस्कृती
माझ्या नाभीमधून स्फुरणाऱ्या

प्रलयी उघाडीत
आनंदाच्या

ये
येतेयस तू
अंगभर थरथरून
उगवत
रोमांचांचे गंधर्व
माझ्या त्वचेच्या
कोट्यावधी मातीतून
ये,
येतेयस तू
फोफावून
लाटांवरून

सगळीच वल्ही
मालवून
प्रचंड निमूट
हरेक
माझ्या हक्कदार
अस्तित्वाची
निगाह
बंदरगाह
व्यापून
मी ऐकतोय समुद्राची
कडीकुलुपं
उघडताना
मी ऐकतोय तालांचे
साखळदंड तुटताना
मी ऐकतोय माझ्याच श्रुतींना फुटणारी
अमानुष नखाग्रं

प्रकाशणारा नगारा
विलयाचा नांगर
ठाय
रुतलेला
मी ऐकतोय
तुझी धिर धिर पावलं
बधिर कपाळात
मी ऐकतोय
मौन दरम्यान
स्थिर
पाण्याचा गुजारा
ऐन तलखलीखाली
तळपणारा
तुझा एकच डोळा
आणि ठार

स्वर्गींध नृत्य
ठाय
ये, येतेयस तू
चौफेरून
घरून
घेरून
रित्या नसांत
अंतिम मॉन्सून
अलक्ष्य निरंजन
हीं धनं, इंधनं
हीं पेटत चाललेली जन्मोजन्म ऋणं
हे वक्री क्षण
हे मार्गस्थ प्रहर
आता चालले
धावले
सर्व इच्छांचा
जीवघेणा उतार
खालवर

थेट
जिथें फक्त
तुझा पांढरा नाच
पुण्यं जाळणारी
अगाध आच
थय थय
तक थर थय
दुर्दम्य ठाय
लय

ये, येतेयस तू
अनिवार
अर्वाच्य अनारंभ
संचार
तडकाफडकी
पाया, लाह्या
फोडून.

ये, येतेयस तू
झालाय तुझा
दारुण
आरंभ
क्षितिजांमधून
उलगडतेय तुझी
मूळ गाठ
माझ्या मेंदूत
ह्या नाड्या
आता दुधड्या
हे देखावे
आता दुय्यम
दुर्बोध निर्यमक
दुस्साध्य कळी
उघडून येतंय
तुझं अमोघ

अश्लाघ्य बोंड
पाकळ्या फाकून
उन्नत
नग्न
नृत्यत्रिशूळ
मरणान्तिक अंग
मीही उघडून

करतो माझ्या
धडग्याचं
थेटर खुलं
आ वासतात
माझ्या डोळ्यांची
रोमन घड्याळं
माझ्या मांड्यांच्या
मधोमध उगवते
सरस्वती गुप्त

माझ्या नाकपुड्या
घमघमून जातात
गंध विंधून
माझ्या पोटावर
तरंग उठतात
उमटतं माझं
संपूर्ण ललाट
एका लयीत
आकर्ण
हिरण्यगर्भ
वितळतो
ठाय.

ये, येतेयस तू
वाजतात गुह्यतंतू
आसुरी हवेत

विच्छिन्न करतो
एकेक तोडा
एकेक मर्म
मर्माघातांचा
चढेल ठेका

पिंजारतो पुरुष
तीव्र तारेवर
तू उत्तुंग
ढगाळ दगड
चांदण्याचा येतेस
जगावर गडगडत
तू काळं.
अतिवास्तव गाडगं
ठिकरून टाकतेस
ठिकऱ्या ठिकऱ्या
ठिक्कर पावलांनी
ठाय

ये, येतेयस तू
छुम् छुम्
छन्नक
छिनाल
नतद्रष्ट पायल.
कोणी रक्षण केलं माझ्या कवटीचं
जेव्हा दिवसाढवळ्या
अज्ञानाच्या अडगळीत
भर दुपारच्या सर्वांगीण फर्निचरखाली
अंगांत मिसळलं अंग ?
कोणी जोपासले
माझे सूक्ष्म डोळे
सगळीच शहरं
उफराटली तेव्हा ?
कोणी वृषणाचा

सांभाळला गुरुत्वमध्य
पाशवी घर्षणात?

कोणी भुकेल्या
पोटात शोधला
अनादि आल्हाद?
तू माझ्या टाकाचा
पहिला शेवटला
फाळ फराटा
तू माझ्या जिद्दीचा
पाटावरवंटा
तू माझ्या मध्यस्थ
शांतीचा उदयास्त
तू माझ्या प्रत्येक
उडीची विहीर
अतलस्पर्श्य
मी मोडल्यात फांद्या, ये,
मी आवरलीत
भरघाव मुळं, ये,
मी झालोय मुकाट
जिवंततेचा बुंधा
घाल कुऱ्हाड
घाल पाणी
लायाड माझ्या
ईर्ष्येच्या काठचा
एकमेव
कमंडलू
फोड माझ्या
इच्छेचा कटोरा
तुडव माझ्या
जाणिवेचं व्याघ्रचर्म
उपट माझ्या
यातनांच्या जटा
गाडून घे मला



तुझ्या विराट
काळोख्या स्त्रीत्वात
ठाय.

माझं अंगांग पिंपळ पिंपळ झालंय्
त्रैलोक्याचा भ्रमिष्ट वारा संचारतोय
ये, स्मृतीत टाळ्यांचा कडकडाट होतोय.

उलथून रात्रीची
चक्रमय स्तब्धता
स्वर्गीय थडगी
तेजस्वी उघडून
मूकगुप्त पाण्यागत
एकदा संपूर्णलेल्या
स्त्री :

ह्या ऐक काड काड मोडणाऱ्या फांद्या
माझ्या प्रज्ञेच्या शुभ्र जखमा
ही बघ माझ्या इंद्रियांनी केलेली
अवाढव्य अफरातफर उघडकीला आलेली
कर अवघ्राण
ह्या फुटणाऱ्या कपाळाचं
हा घे स्वाद
माझ्या चरित्राचा विरणाऱ्या
कर स्पर्श
ह्या अनुभवांच्या खवल्यांना
उचकटून काढलेल्या
खोडून काढ हा मुका जलचर
कंठस्नान घाल ह्या सर्वांगीण पशूला
चिरडून टाक हे उत्फुल्ल फूल

विस्कळून टाक हा मग्न पक्षी
भरारीतल्या भरारीत

अनिवार दुःस्वप्नांतला वणवा
फोफावत येतो आगीचा लोळ
आणि खाक होतात
जागृतीच्या कडा
तो सर्वस्वाचा
सर्वांगीण विराट आंधळा संचार आता संपव
आता संपव हे अंधार आणि प्रकाश
आता तोड बोटाबोटांच्या पेरांतले पार्थिव सांधे
आता फाडून काढ उभी सबंध अंगाची कातडी दिशाभूल
आता फोड आतड्यांत वर्षानुवर्षं वाढवलेलं उग्र वारूळ
आता ह्या हार्दिक विवेकांचाही कर जीर्णोद्धार
मला जाळ तुझ्या विक्षिप्त झोतांत
मला चिखल तुझ्या प्रक्षेपी पावलांखाली
मला थुपून ने तुझ्या प्रलयी पाण्याखाली
मला भिरकाव तुझ्या उदंड घुमश्चक्रींत
गोंद तुझ्या साक्षात्कारी शुभ्रतप्त दाभणाने
माझ्या अंगावर सहनशक्तीच्याही पलिकडलं अमोघ नक्षत्र

उघडून टाक
माझे पाचही प्राण
तुझ्या थयथयीच्या
बेदम समेवर ...

ओझरतंच होतं
ह्यापूर्वीचं प्रत्येक दर्शन :
अकल्पित
रस्त्यांतला
एकच
सदैव भुकेला माणूस :
अत्तरासारखे तीव्र
अन् पारोसे डोळे
एकाच स्त्रीचे :
हॉस्पिटलात मध्यरात्री मर्क्युरी प्रकाशात
प्रचंड घुमटाखाली वाजलेले माझे स्वतःचेच



अस्वस्थ टाचांचे बूट :
दारूची जळती गुळणी :
पाण्यात बहरलेला पारिजात
आणि हालत्या अंगांतला सुखाचा कहर :
कलंडत्या कक्षांवरून
पाहिला मी तुझा
देखणा उद्दीप्त अंगठा
झळाळत उठताना
तो अंतिम
लयीचा इशारा
बघून शहारलो
घाबरून गेलो
आणि दरम्यान तुझं हलक पाऊल हसून दिसेनासं झालं...

आता ये
साक्षात थेट
आता
आपली भेट
संपूर्ण उभय
आता आपले डोळे
परस्पर खोल
आता आपले चेहरे
नुसते हिंदोल
आता मूळचा
अस्तित्वपाया
उघडकीला येईल
तुझ्या अनारंभ
अंगठ्याखाली

उलथून स्तब्धता
रात्रीची चक्रमय
उघडून थडगी
थंड तेजस्वी
स्वर्गीय स्त्री

ये, ह्या आताच्या
बाहूंच्या अस्तांत :

## पशू

तांबं काळं पडतं. हळू हळू काळवंडतात भांडी
भिंतीचा रंग उडतो. विरतात सॅटीनची अस्तरं.
बूट फाटतात. आंड लोंबतो. थानं बेढब होतात.
फोदे फताडे होतात. बुबुळांचा रंग उडतो.
कातडी सुरकुतते. भावनांची ढास लागते.
विचार कण्हतात. विरत्या तळहातात
विरळ होऊन ऩाहीशी होतात उन्हं.
तेव्हाच नुक्ती शाटं फुटलेलं
पहिलून माडी चढतं कालचं तान्हं.
शरीराचं भविष्य सांगतात ग्रंथींची नक्षत्रं.
बचावलेली कातडी निर्ढावते पण धसकते.
आरशांचा पारा उडतो. चेहरे धुपून जातात
मरण हळू हळू येत असतं. ते खिळवतं
चेहऱ्यावरले भाव, स्मितांच्या आणि नजरांच्या
मर्यादा. भुवयांची हालचाल. आवाजाचा टप्पा.

मरण येतं सवयीच्या पावलांनी सवयीचं मरण.
मरणाची सवयीची हालचाल. ठरीव वर्तणूक
प्रेतांना चाकोऱ्या पडतात. ती ओलांडत नाहीत
आपली मळवाट. मरण फिक्स् करतं
रोजचा रस्ता, रोजची झोपायची वेळ,
खुशीची आणि दुःखाची निमित्तं, खुद्द
मरणाचा विचार, सामाजिक कर्तव्यं,
ऐहिक गरजा, देहाच्या जुजबी हद्दी,
भास, वेड, ठरीव प्रक्रिया मरण करतं
चिरंजीव-संवयी, अधू आकांक्षा, बद्द संवेदना.
पशू मरतात अचानक आणि एकवटून.
त्यांच्या प्रतिक्रिया असतात ठरीव पण त्यांचं जग
सतत टपून बसलेलं असतं त्यांच्याविरुद्ध.
त्यांचं जग विक्राळ पालटतं, वाघ झडप घालतो.
हत्ती चीत्कार करतो, हरणं तडात्तड् पळतात,
त्यांच्या जगाच्या जंगलात असतात धावते
पिवळे आणि काळे पट्टे जर्द रात्रीत.
त्यांचे आवाज फाडतात शांततेचं गोठलेलं रक्त
एकाकीपणाची नखं आणि खवले,
एकटेपणाचं केसाळ कातडं,
दुसऱ्याची गरज
उद्युक्त जननेंद्रियं आणि कान
आवाज फोडणारे स्नायू
चिन्हहीन जंगलांत वावरतात पशू
काळोख्या काळोखात, प्रकाशत्या प्रकाशांत
दौडत्या बुबुळांचे खूर दृश्यांचा धुरळा
शत्रूचा, सावजाचा आणि मादीचा वास
प्रत्येक वस्तूंत मिसळलेला. जगाचा वास.

*

# सतीश काळसेकर

**Satish Kalsekar**

# ...असं तर व्हायला नको होतं

आपलं आपल्याला असं तर व्हायला नको होतं
हातचं राखून बोलायचं नव्हतं कुणाशी
बोलताना कुठल्याच शब्दावर अडखळायचं नव्हतं
क्षणभरही.

सगळ्या आयुष्यातल्या बऱ्यावाइटाचं हलाहल पचवून
त्याचं निळंशार शालीसारखं आभाळ पसरायचं होतं
सगळ्यांवर कवितांच्या ओळींतून थेट.

आपल्याला नको होती आयुष्यात
कुठलीच अधलीमधली विरामचिन्हं
सरळच जायचं होतं पूर्णविरामाकडे
तर मध्ये किती ही वाढली
नको असलेली घरंगळ.

रुपयाची किंमत हवी होती आपल्याला फक्त रुपयाच
न अधिक न उणी
दारूला म्हणायचं होतं फक्त दारूच
कशालाच जोखायचं नव्हतं काही कमी-जास्त
वावरताना वावरायचं होतं
नुकताच जन्म घेतल्यासारखं.

कुठून कुठं आलो आपण
वस्त्र घातली आयुष्याला भरजरी
नको त्याला झाकायला शिकलो
आणि किती चढवले मुखवटे
खरं आणि खोटं याची मोजदाद करीत राहिलो
कसबी उलाढाल्यांसारखे लिहीत राहिलो
हिशोबाच्या दुहेरी वह्या
कधी आणि कसे चढले
मुखवट्यावर मुखवटे आणि हरवतचं गेला
आपला चेहऱ्यातला चेहरा.

आपल्याला नको होत्या आपल्याभोवती
अशा अंधार आवळत आणणाऱ्या भिंती
प्रकाश भरपूर असावा
म्हणून आणल्या विशाल खिडक्या
तर त्यांवर वाढतच राहिल्या
साठीषण्मासी पडद्यांच्या कनाती.

आयुष्याभोवती निर्माण करावं
गूढतेचं वलय
असं तर कधीच नव्हतं वाटलं आपल्याला
तरीही वर्षानुवर्षांच्या रात्रीनंतर ही कासाविशी
कुठून कसं आणि काय उलटलं
आणि सगळी मुळं गेली विस्कटून
असं तर नव्हतं आपल्याला विखरू द्यायचं मातीला.

भर मध्यान्ही उघड्या आभाळाखाली
आपण झेलला आनंदात
सूर्याचा प्रखर प्रकाश तापल्या वाळूत
पाठीवर आणि पोटावर
तसा आयुष्यभर सहवासात
उभा करायचा होता सहकार
तर आपण फुत्कारतच राहिलो सगळा विखार
आणि नासवूनच टाकलं उतरणीवर
उकिरड्यासारखं सहवासाचं कलेवर.

कसा झाला ऱ्हास साऱ्या सोन्यासारख्या
मानवी संबंधांचा
आणि निर्जीव वस्तूत बदलून गेलं
आपलं वस्तुजात.
कसे कळू लागले आपल्याला आपल्या नकळत
खरेदी-विक्रीचे अमानुष व्यवहार
आणि सगळ्या जिवाशिवाच्या नातेसंबंधांत
उगवलं आर्थिक संबंधांचं तण निबर.

शरीरातल्या सहस्र कळ्यांना बहर आणायचा होता
परस्परांच्या स्पर्शातून
रोमारोमांत पसरायचं होतं चैतन्य
तर आपण दिवसादिवसागणिक
त्यांना मरू दिलं अकालीच
आतल्याआत वाळून करपू दिलं
सगळं हिरवं रान.

परस्परांच्या सावलीत राहून
स्वतंत्र करायची होती आपली मनं
सर्व दिशांतून पसरवीत त्यांची पाळंमुळं
आणि सजीवही ठेवायची होती
आपली ही मर्त्य शरीरं
तर पाहता पाहता चरतच गेला
मालकीहक्काचा कॅन्सर
आपल्या अवघ्या आयुष्यावर.

आपण हरवतच गेलो आपल्याला
साध्य-साधनांच्या अरण्यात.
स्वत:ला शोधत आत आत पोचायच्या प्रवासात
अधिकाधिक बाहेरच फेकलो गेलो
कातडी सोलत.

निमित्तमात्र करायचं होतं शरीर
आणि घ्यायची होती
एक आध्यात्मिक उडी
तिथूनच झाली असती
खरी सुरुवात
तर शरीरातच गुंतून राहिली शरीरं
आणि उभारणीसाठी
जमवता जमवता विटा
विटाच जमवण्यात
संपत गेली उभारणी.

✧ ✧

अशोक नायगावकर

Ashok Naigaonkar

## ते व तू

ते फार्म हाऊस
स्वीमिंग पूल
गार्डन झुला
        तू म्हाडाच्या लायनीत
        फॉर्म भर
        वाट बघ लॉटरीची
ते कुलू-मनाली
थ्री स्टार
सिंगापूर-बँकॉक
        तू शनि-शिंगणापूर
        आटपाडी-वैजापूर
        धर्मशाळा
ते पिझ्झा
चिकन टिक्का
रॉयल चॅलेंज
        तू वडापाव
        भजीपाव
        नवटाक
ते क्रेडिट कार्ड
त्रिभुवन दास
        तू ठेव
        गहाण हंडा-कळशी
        फिर बोंबलत

आंबा असो
फांद्या झुकोत जमिनीवर जडावल्या
चैत्रांगण असो सारवले
उमटोत पावले
राशी भरोत गव्हाच्या
सूर घुमो लाऽऽभ दोऽऽनचा आठवडी बाजारात
वाळोत पापड कुरड्या माळवदावर
रटरटो पुरण
शेवया लगटोत बोटांवर
बाया असोत नऊवारी
माठ झिरपोत थंडगार
चव असो वाळ्याची
असो तहान
असो डाळ पन्हे पानावर
हळद मिळो माहेरवाशिणींना
मोगरा असो केसात
सांजेवर गंध पसरो कडुनिंबाचा
नवे येवो
गोंडा असो
टाळा झुलो दारावर
झळा असोत
तापून निघो
निथळो घाम
त्वचा फुटो नवी
गुढ्या उभारोत
कुणीतरी देव होवोत

# यशवंत मनोहर

**Yashwant Manohar**

## मी मागितली

मी मागितली झाडांना पुष्पपिसाऱ्याच्या चमत्काराची सिद्धी
आणि आभाळाला नक्षत्रांची स्वतंत्र सुगंधी रांगोळी मी मागितली
मी एक क्षितिज मागितले माझ्या मनगटातील युगाच्या उद्यासाठी
आणि मोहोरणाऱ्या पायांसाठी उजेडाची उजाड न होणारी
खंबीर वाट मी मागितली.

हृदयाने माझ्या मागितली एक नजर जिच्यात तिरस्कार नसेल
आणि एक अपर्यायी विश्वास ज्यातून माणूस गहाळ नसेल
चार रात्रींनंतर चार दिवसही अपेक्षिले माझ्या
उपटून फेकलेल्या आयुष्याने
मागितले प्रवाहासारखे वाहणे आणि कंठासाठी भयमुक्त गाणे

मी मागितले धरतीसाठी सुसभ्य वास्तव सकलसमांतर
मागितली पंखांची अनिर्बंध दौलत
आणि उड्डाणासाठी परमात्मा न मानणारे निरोगी अंबर

# अशोक बागवे

**Ashok Bagwe**

विचार चाललाय
आकाशाला लावून घ्यावा
वॉलपेपर मातीचा
क्षितिजापासून थेट वरपर्यंत
अन् जमिनीला टाइल्स पाण्याचे
विचार चाललाय...

विचार चाललाय
पंक्चर करून एक ढग
पेरावा अंगणात कारंजे म्हणून
भिंतीवर लटकवावे इंद्रधनुष्य
असेल ज्याच्या शेजारी
एक भाते पावसाच्या बाणांनी भरलेले
विचार चाललाय...

विचार चाललाय
सूर्याला दिवसाऐवजी रात्रपाळी
व चंद्राला दिवसपाळी द्यावी
म्हणजे मग चोराच्या मनात
चांदण्याऐवजी असेल ऊन
विचार चाललाय...

विचार चाललाय
चांदण्यांचे बल्ब बदलून
तिथे फिलिप्स वा ओसरामच्या
चांदण्या बसवाव्यात
व झाडावर करावी रोषणाई चांदण्यांची
विचार चाललाय...

विचार चाललाय
जिथे जिथे जाईल तडा जमिनीस
लांबी भरावी तिथे तिथे
रंगवून टाकावी जमीन सारी
हिर्व्यागार डिस्टेंपरने
विचार चाललाय...

विचार चाललाय
रचून डोंगर एकावर एक
बांधावी स्कायस्क्रेपर उत्तुंग एक
ढगांऐवजी बसवाव्या टाक्या
सिंटेक्सच्या आभाळात
म्हणजे मग चुकले अंदाज वेधशाळेचे
तरी काही हरकत नाही
विचार चाललाय...

विचार चाललाय
अडखळू नयेत बोटी म्हणून
काढून टाकावेत स्पीडब्रेकर लाटांचे,
अन् मारून घ्यावी टाकी समुद्राला
म्हणजे मग घसरून बुडण्याचे
भय मुळी उरणार नाही
मात्र टाकी मारताना
डोळे घट्ट मिटून घ्यावेत
एखादा कण पाण्याचा
डोळ्यांत जाण्याचे निमित्त
पाहणाऱ्याला वाटेल
आपण रगडतोय उगाचच
शेवटी समुद्र काय वा अश्रू काय
दोन्ही खारटच
विचार चाललाय...

९-३-९९

दास् वैद्य

**Dasu Vaidya**

## आयुष्य

कमी तापवलं तर
नासण्याची भीती

जास्त तापवलं तर
आलेल्या दाट सायीमुळे
गुदमर होतो आयुष्याचा

विस्तवावरच ठेवलं तर
राखेशिवाय काय सापडेल?

या त्रैराशिकाच्या गोंधळात

गणित चुकलेल्या विद्यार्थ्याने
छडी खाण्यासाठी
डोळे मिटून हात पुढे करावा
तसा मी उभा आहे
पाच फूट सहा इंचाच्या बाकावर.

□

## कसं वाटतंय् आता?

बाथरुममधले थंड-गरम पाण्याचे नळ
म्हणजे पवित्र नद्या,
साबणा घासून घासून एक दिवस
अंगावरची कातडीच सोलून निघेल,
दात पेस्टमधेच विरघळून जातील,
शॅम्पूच्या माऱ्यानं
डोक्यातली मेमरीही धुवून जाईल,
सेंटच्या वासानं
घामाचा मूळ वासच बेपत्ता होईल

टॅबलेटस् गिळून गिळून
पोटात मेडिकल थाटल्यासारखं,
कपडे घातल्यावर
शोकेसमधल्या स्टॅच्यूसारखं,
रिमोट हातात घेतल्यावर
जग खरेदी करायला पिशवी घेऊन
निघाल्यासारखं,
जाहिरातीत फसफसणाऱ्या पोरी पाहून
आपल्या बायका फक्त गृहउपयोगी
असल्यासारख्या,
रस्त्याने चालताना प्रत्येक दिवस
बंदूक घेऊन पाठलाग केल्यासारखा,
पोराशी बोलताना अपराध्यासारखं
बापाशी बोलताना तिऱ्हाईतासारखं
प्रेयसीशी वागताना हरल्यासारखं
बायकोशी बोलताना गुदमरल्यासारखं,
चालताना तरंगल्यासारखं
तरंगताना बुडल्यासारखं
झोपल्यावर जागं असल्यासारखं
बोलताना विसरल्यासारखं
गाण ऐकताना उदासल्यासारखं
पेटताना विझल्यासारखं
आणि नाकात चिलट जातं
तेव्हा श्वास घेतल्यासारखं वाटतं

एवढं सगळं मी एका दमात सांगून टाकलं
डॉक्टरांनी जेव्हा नाडी तपासताना विचारलं,
'कसं वाटतंय् आता?'

□

## डायव्हर पिळतो स्टेअरिंगचं शेपूट...

'प्रासंगिक करार'च्या मुंडावळ्या
बांधलेली एस्टी पायाने ठोकरते
ओला नारळ,
डायव्हर पिळतो स्टेअरिंगचं शेपूट
आणि बाजूची झाडं पळायला लागतात,
लाडू-चिवड्याची रवंथ करीत
वऱ्हाडी गातात गंमतगाणी,
बस चुकलेल्या चुकार पाव्हण्याला
रस्ता नीट सापडावा म्हणून
खिडक्या धरून बसलेले
अविरत थुंकत राहतात पचापच,
मांडव उरावर घेऊन बसलेला गाव
पुंग्या-पिपाण्यांनी ऐकूही येऊ लागतो,
मुरुम भरलेल्या ट्रॅक्टरची ट्रॉली
रिती होते बांधकामावर
तशी अवघी बस उतरते मांडवदारी,
झाडाखाली सावलीच्या हवाली बस देऊन
पारावर आडवा झालेला डायव्हर
दुपारी केव्हातरी लगीन पंगतीतलं
गोडधोड खाऊन घेतो,
अंधुरक्या संध्याकाळी

जडावलेले वऱ्हाडी
भरतात गाडी
पुन्हा एकदा काठोकाठ
डायव्हर पिळतो स्टेअरिंगचं शेपूट...

दुसरा दिवस
तीच बस
तोच डायव्हर
माथ्यावरची पाटी फक्त बदललेली
अमुक गाव जलद तमुक गाव
रोजची ड्युटी
पब्लिकची दाटी
डायव्हर चालवतो बस नाकानिट्ट
त्याला दिसत नाहीत बाजूची पळती झाडं,
त्याचं मन गुंतत नाही
डोंगरावर पसरलेल्या हिरवळीसाठी,
कुठल्याच स्टँडवर
त्याला निरोप द्यायला येत नाही कोणी,
डायव्हर घेत नाही
पेपर विकणाऱ्या पोऱ्यापासून
एखादा टाईमपास पेपर,
तो कधीच भक्तीभावे भिरकावत नाही
पुलाखालच्या नदीत चार आण्याचं नाणं,
बस भरून उलथली
तरी कोणी सांगत नाही हक्क
डायव्हरच्या जागेवर,
कित्येक मशहूर गावातून
डायव्हर फिरवतो गाडी लिलया
पण विसरतो घ्यायला

पोरीसाठी एखादं खेळणं,
प्रवासी बसतात
प्रवासी उतरतात,
हा ठेवतो मोजदाद
रस्त्यावरच्या खड्ड्याची
मधोमध उगवलेल्या डिव्हायडरची
धोकेबाज वळणाची,
मधेच स्टेअरिंगला गिरकी देऊन
चुकवतो रस्त्यात पडलेलं कुत्र्याचं धड
(म्हणून त्याला खूप फुशारकी वाटत नाही),
गावाच्या नावापेक्षा त्याला पाठ असतात
किलोमिटरचे आकडे

'धोक्याचे वळण'
'गतीरोधक'
'घाट प्रारंभ'
'बाजूचे वळण वापरा'
असल्या पाट्या त्याला दिसतात लख्ख
अध्यात्मिक ओंकारासारख्या

काल मांडवात खाल्लेल्या
गोडधोड अन्नाची चव
रेंगाळत नाही त्याच्या जीभेवर,
कंडक्टरच्या संगनमतानं बस थांबते
एखाद्या फाट्यावर,
तेव्हा हा भजे कुस्करतो खिचडीत
वर फर्माइश करतो
तेज तेलकट तर्रीची,
कडक मिठ्ठा चहा घशात ओतल्यावर
दाढेत बसते तमाखूची चिमूट,

मग कुळकुळीत डांबरट रस्त्याशी
चाकं होतात अधिक संवादी

डायव्हर एक वफादार माणूस
ज्याचा चेहराही न पाहता
लोक करतात स्वत:ची जिन्दगी
त्याच्या हवाली बिनघोरपणे,
उगवत्या सकाळी निघालेला डायव्हर
सूर्याला आणून पोहोचवतो
अंधाऱ्या रात्रीजवळ,
दरम्यान त्याला माहिती नसते
ढळलेल्या संध्याकाळी घरी मुलांनी
हातपाय धुऊन परवचा म्हणलाय का?
बरणीत तेल उरलंय का?
पोराची फिस भरलीय का?
त्याला कसलीच चिंता करायची नसल्यामुळे
तो पितो गटागटा
चपट्या बाटलीतलं जादुई पाणी
(सोबत छटाकभर चिवडा)
आता एकदम गाडी टॉपवर
याची चाकं होतात आधर आधर
तरंगतात हवेत

डायव्हर झोपतो बहुजन सुखाय,
डायव्हर घोरतो बहुजन हिताय

डायव्हरला पडतात स्वप्न
बोनस मिळाल्याची,
अठ्ठावीस वर्ष एकही डॅश न देता
गाडी चालवल्यामुळे
सरकारी इनाम मिळाल्याची,

तर्तास...

पोरीचं लग्न जमल्याची,
पोराचा पंक्चरलेला इंग्लिश विषय
ऑक्टोबरचा जॅक लावून
सुखरूप निघाल्याची,
लांबलचक काळ्या सडकेसारखी
स्वप्नाची रीलच उलगडत राहते स्वप्नात,
डायव्हरला येते जाग खडबडून,
उगवता सूर्य पोहोचवायचा असतो
दूरच्या अंधारणाऱ्या गावात,
म्हणून लगबगीने
डायव्हर पिळतो स्टेअरिंगचं शेपूट
बस उधळते चारी खुरावर...

वायपरसारखा डायव्हर प्रवासतो
या गावावरून त्या गावाला
त्या गावावरून या गावाला

पण पोहोचत नाही कुठेच...

**पोयट**
**मिलेनियमचं**
**गाणं लिव्हतो तव्हा...**

ग्यानबा - तुकारामाच्या शब्दाचं
नाक-डोळं घेऊन जलमलेले शब्द माहे
'गाव तेथं यष्टी' प्रमाणं
भवताल पसरलेली माही मराठी पोएट्री
अन् मला मिलेनियमचं गाणं लेव्ह म्हणता,
आपला भेजा सरकला तर लई डेंजर
मिलेनियम-फिलेनियमच्या लग्नाचं
मंगळाष्टकबी लेव्हीन,
लेव्हीन काय लेव्हलच व्हतं मी
मिलेनियमच्या स्वागताचं गाणं
तर डुगडुगती मान हलवीत
कापऱ्या शब्दात म्हतारी बोलली,
'अरं बाबा, ते मिलेनियम आलं म्हणून
काय वरडतूस
त्यापरीस नळाला पाणी आलं असतं
तर बेस झालं असतं'
आपण अंदरून हादरलो
घशाला कोरड पडली,
विश्वसुंदरी लावते तो किरीम लावून
गोऱ्या पडलेल्या बायकोच्या हातानं
पेप्सीचे चार थेंब घशात वतले
तव्हा जिवंत वाटलं,
पोयट; पुन्हा त्यात मऱ्हाटी
मग अटकेपार कोशीश करणारच
अन् सिलिकॉन सिटीत जावून
कविता म्हणायची तमन्ना ठेवणारच,
बायको म्हणली,
'शब्दायचेच मुके घेता
सारा जोर घरातच
जरा बाहीर जावा की',
आपण बोललो,
'इमोशनल नही होने का
ई-मेल-डॉटकॉमचा जमाना हाय,
रिमोट हातात ठेवून चॅनल बदलायचे
बाहीर पार्कींगला तरी जगा हाय का?
चल ऊठ
संध्याकाळ झालीया
देवाम्होरं दिवा लाव
अन् मह्यासाठी सिक्स्टीचा पेग भर,
संस्कृती म्हतारी झाली म्हणून
तिला खाटकाला इकणार का?
बसू दे बिचारीला कोपऱ्यात
लई दिवसाची सोबती नाही
कव्हा-बव्हा चापाणी देत जा तिला'.

□

**मूळ हिंदी : पवन करण**
**मराठी अनुवाद : बळवंत जेऊरकर**

# माझं अजूनही तिच्यावर प्रेम नाही

माझं तिच्यावर प्रेम नव्हतं
माझं अजूनही तिच्यावर प्रेम नाही
ती मला आवडत होती
ती मला हवी होती
खरं तर मला तिचं शरीर हवं होतं

मला तिच्या शरीराला स्वत:च्या जखमा चाटणाऱ्या
कुत्र्यासारखं चाटायचं होतं
तिच्या शरीराला उसाच्या कांड्यासारखं चोखायचं होतं
तोंडात भरून घेऊन
साखरेच्या दाण्यांसारखं चावायचं होतं

मी ज्या-ज्या वेळी तिला पाहायचो त्या-त्या वेळी विचार करायचो
कसं असेल तिचं अंतरंग
किती उजळ असेल ती आतून याहूनही अधिक
शरीरात उजेड भरून घेऊन
कशी असेल तिची त्यावेळची लाज
कसं असेल तिचं त्यावेळचं हसू

मी तिला तेव्हा जगातील
सर्वात सुंदर स्त्री म्हणायचो
जे नंतर मला तिच्याबरोबरच्या
अनुभवात जाणवलंसुध्दा
आणि तिला हे बऱ्याचदा सांगतही राहिलो मी



तिच्या शरीराच्या दुनियेत
प्रवेश मिळवण्यासाठी मी स्वत:ला
तिच्या पायाशी गवतासारखं पसरलं
मी तिला म्हणायचो 'तुझ्या सुंदर पावलांखाली
जितका दबला जाईन तितकं उजळेल माझं रूप
मला तुडवत-तुडवत मनसोक्त
चालत रहा तू
मी तुझ्या पावलांत वाढतच जाईन
पृथ्वीच्या त्या टोकापर्यंत पोहचूनसुध्दा
संपणार नाही माझा विस्तार'
स्वत:ला धरणाऱ्या दरवाज्यांसारखं उघडून
तिच्या डोळ्यांतलं पाणीच पाणी होऊन
मी तिला मासोळी होण्यासाठी केलं विवश
भाग पाडलं तिला पोहण्यासाठी

आज तिच्यासोबत इतक्या दूरवर आल्यानंतर
मी तिला विचारतोय
कुठं हरवला तुझा संयम
कुठं गायब झालं तुझं 'नाही-नको'
तुझ्यासाठी चांगला नाही हा वेग
कुठून शिरकाव केला यानं तुझ्याआत
लगाम घालणं गरजेचं आहे याला
मला तर कल्पनाच नव्हती तुझ्या आत
इतका पूर असू शकेल
हा तर मलाच वाहवून नेतोय

माझं तिच्यावर अजूनही प्रेम नाही
ती मला अजूनही फक्त आवडते
मला तिचं शरीर आवडतं
पण तिचे डोळे आता पुष्कळदा माझ्याआत
माझा जुना अनुनय शोधत असतात
ज्यानं एके दिवशी स्वत:च्या वादळात
उडवून दिलं होतं तिचं धैर्य

# कविता महाजन

# आत्ममग्न

सारी आव्हानंच सरली जगण्यातली
साद घालावी असं कुणीच उरलं नाही
सगळेच पाश कुजके बनलेले
पेटून उठावं असे वाद राहिले नाहीत
आणि आता तर सारे प्रश्न
सहज विरघळून गेले आहेत
मरणाचं नाव उच्चारलं त्या क्षणातच
०

सगळी नाती नोंदवून ठेवली नोंदवहीत
सारी पत्रं तारीखवार नीट लावून ठेवली
आठवणी स्वप्नं टाचून कागदावर
आयुष्याची टिपणं डायरीत काढून ठेवली
असं काहीबाही करून वेळ घालवू पाहतेय
अजून किती वाट पाहू तुझी, मृत्यो ?
०

मरणाचं स्पष्ट होणारं एक एक रूप
मन सुन्न करणारी संवेदना
मरणाचे अर्थ समजूनही मी उदास
प्रेम मिळत असलेल्या प्रेयसीसारखी
अनेक माणसं मरणापुढं
दयेची याचना करणारी
पण मरण मात्र आत्ममग्न
कुणा कवीनं आपल्याच नादात
नकळत शब्द निवडावेत... तसं
चपखलपणे एकेक जीव उचलणारं
●

## तुला अनुसरत

एखाद्या जंगली जनावराप्रमाणं
माझे शब्द घासतात अंग
तुझ्या टणक, जून मौनाच्या खोडाला;
ओरबाडतात साल पुन:पुन्हा
नखे धारदार करण्यासाठी.

माझ्या स्पर्शांचा वारा सणसणत वाहतो
तेव्हा सळसळून हलतो
तुझ्या मौनाने पेललेला आभाळाखालचा
हा अवाढव्य हिरवा विस्तार;
आणि ओरखड्यांच्या रेषांमधून
दिसतो स्रवताना घट्ट शुभ्र रस.

मी लिहिते तुझं नाव माझ्या तळहातावर;
रेषांच्या जखख जाळ्यावर संथ तरंगतंय ते
तीन तरतरीत अक्षरांनी ताज्या.
हे जाळं मला खेचून घेता येणार नाहीय
तळहातावरून, तुझ्या नावासाठीसुद्धा.

मी बसलेय हळूहळू निवत. शांत. चिडीचूप.
हातात हात धरून बघत एकटक.
मला जाणवू लागलीय अपरिहार्यता मौनाची.

मुळांपासून पानांपर्यंत जीवनरस पोचवण्याची
केवढी अव्याहत धडपड सुरू असते आत
हेही समजू लागलंय हळूहळू.
आणि माझ्या मनात मधूनच उसळणारी
हज्जार शब्दांची हुळहुळी खळबळ
एकवटत, घट्ट होत होत, आतल्या दिशेनं
वळू लागली आहे मौनाच्या केंद्राकडे;
तुला अनुसरत.

# जंगलाच्या विस्तारातून

बेफाम वाढलेल्या जंगलाच्या विस्तारातून
    प्रवास करीत
मी पोहोचले विस्तीर्ण हिरव्या माळावर; मोकळ्या
आकाशाखाली अंग तोलले पावलांच्या
बोटांवर. घेतल्या गिरक्या थिरकत...अंग अधांतरी...
लोळले हिरवळीवर. जांभळ्या
फुलांना किंचित चुरडत, मान उचलून श्वास जरासा
भरून भरभरून घेतला वास तुझा आणि
खुपसले मस्तक माझे कुरळ्या गवताच्या पात्यांतून
टणक छातीवर हिरव्या माळाच्या.
झऱ्याच्या प्रगल्भ काठावर थांबून, लवलवता
बुडवून अंगठा पाण्याचा अंदाज घेतला
आणि उसळले आकस्मिकच लाख चमकते थेंब
अंगभर, निथळत पुन:पुन्हा अंगाहून, काही
अडकले केसांत, कदाचित मेंदीच्या वासात
गुरफटून.
    तेव्हा गोंदले मी मांडीवर
तीळ तुझ्या तळहातावरचे आणि पहुडले
पाषाणावर, कभिन्न काळ्या काळाची लय
वेटोळून घेत अंगाभोवती; डोळ्यांमधले पाणी
    सुकवीत.

अरुण कोलटकर

Arun Kolatkar

## फुलपाखरू

एकतर तुझ्यामागं कसलीच गोष्टबिष्ट नाही
ष्टोरी कथा काणी
काहीच

ही एक गोष्ट बरी आहे
मागचा पेच नाही
पुढचा पोच

पाठीवर बोचकं नाही
नुसते
नुकते नुकते पंख

दोन क्षणार्ध
एकमेकांना
सामिल असलेले

आगा ना पीछा
फक्त उघड
झाप

एकट्यानंच खो खो खेळ
स्वताभोतीभोती
उलट पालट अध्यात मध्यात

पंखलिपी शिकव
वाऱ्यांना
कानपिचक्या दे

काळाच्या कानामागून ये
आणि काळाच्याच डोक्यावर मिरी वाटून जा
पृथ्वीच्या करपलेल्या नाकावर टिच्चून शिवाय



खिरापत हो
दोन खांदे वाटून दे
चार दिशांना

पाच दैत्यांना
पंचवीस देवळांना
तीनशे दीपमाळांना

गवताच्या
पाच हजार
करपलेल्या पात्यांना

धांदल करू नको
सगळ्यांना पुरून उरणारायस
खूप आहेस

हळदुली चिमूट
वारेमाप भंडारा
तुझा येळकोट असो

या दरिद्री डोंगरांना
आपल्या पंखाखाली घेणाऱ्या
फुलपाखरा

देवळातला वरवंटा
सुरवंटासारखा सुंदर असता
तर ही समुद्रवलयांकित पृथ्वीपण

तुझ्यासारखीच सुंदर झाली असती

# अरुणा ढेरे

**Aruna Dhere**

## प्रार्थना

ज्यांचे पाय भुईत खोल गाडलेले
आत्मे आभाळओढीने अधांतरी टांगलेले
जन्माच्या नाळेचे वेढे ज्यांना
वास्तवाच्या दलदलीत ज्यांच्या रसदीचे संदर्भ बुडालेले

ज्यांना सृष्टीशी स्थापित करायचा आहे
एक अंतहीन संवाद
जे संवेदनांवर बधिर अमानुषतेचे आघात झेलत राहिलेले

उमटावे गोविंदगुणी पदचिन्ह कधीतरी
म्हणून ज्यांची हृदये सारवून सिद्ध असलेली
अन् भलेपणावरचा विश्वास सांभाळत
वाऱ्यावादळात ज्यांची हयात गेली

फळांचा विचारही उमटला नाही मनात
जे जपत आले झाडाला झाडपणासाठी
घासातला घास काढून ठेवत आले अंगणात
पाखरांच्या मुक्तनिर्भर माघारपणासाठी

जे आहेत म्हणून शाबूत आहेत आमची स्वप्ने,
आमचे जग, आमच्या अस्तित्वाच्या वाती
प्रार्थना स्वतःला पेटवून त्यांच्यासाठी

●

## एखाद्या संस्कृतीचा आत्मा

एखाद्या पुरातन संस्कृतीचा आत्मा
वाहतो कधी सनातन नदी होऊन,
होऊन तिचे अनपेक्षित वाक, कठोर उतार
जेव्हा तिन्हीसांजेला घाटावर पेटलेल्या धुनीपाशी
रेंगाळतात बैरागी पावले
तेव्हा पडझड झालेल्या एकाकी शिवमंदिरात
निराश्रिताच्या प्रार्थनेसारखा अश्रू आवरतो अंधार

जीवन धुमारते सगळीकडून रसरसून
जेव्हा घुंगुरमाळा वाजवीत निघालेल्या
वऱ्हाडाच्या बैलगाड्यांमधून
तरुण मुलींची हृदये, गाणी होऊन
मावळत्या उन्हात किणकिणत राहतात
आणि रंगीबेरंगी शेमले उडवीत
गावजत्रेच्या पाळण्याबरोबर
वयाच्या बिंदूंवर मागेपुढे झुलणारी माणसे
शीणभाग विसरून उमेदीने शीळ घालतात

उपाशी पोटांचा विसर पाडणारी
अद्‌भुत रोमांचक दंतकथा
सांगत राहते आपल्या लहानग्यांना एखादी आई
संस्कृती असते तेव्हा
जुन्या लुगड्याचे तुकडे जोडलेली गोधडी
किंवा सोशिकतेची धग लागलेला अंधारही

बांबूच्या कामट्यांबरोबर विणत राहते
आपल्याच काळजाला एखादी वृद्धा
तेव्हा संस्कृती होते तिचे मायाभरले मन
अन् नाकातली मोरणी चमकावीत
तिची तरणी सून जो धरते
आपल्या उच्छादी पोराच्या ओठाशी
तो भरून सांडणारा दुधाळ स्तन

एखाद्या संस्कृतीचा आत्मा
नसतो जेव्हा दगडी दमट अंधारात
तेव्हा तो सहज हलताना दिसतो
सृष्टीशी संवाद साधणाऱ्या
सार्थसुंदर कार्यात
अन् कुणाही साध्या माणसाच्या
सत्त्वशील हृदयात

●

**Azim Nawaz Rahi**

# कवितेला लागणारी विषयांची रसद

कावतो जीव
लावताना मेळमाळ रोजगाराचा
परततात घेऊन धग अपमानाची मोहल्लेकरी
विसरतात दिवसभरातला घटनाक्रम जहरी
बघून चेहरे चिल्यापिल्यांचे

हरपतो तणावात चेहरा आयुष्याचा
येत नाही जगता मनासारखे
होते कटकटीने सुरुवात दिवसाची
असतो एखादा घाव हमखास
जातिवाचक शिवीचा मावळताना

करू शकत नाही जगण्याचा विचार
मोहल्ल्याला वगळून मी
आहेत खोलवर रुजलेली
अस्तित्वाची मुळे मोहल्ल्यात
माणसे, शेळ्या, कोंबड्या, बदकांसह
रेंगाळतो माझ्यात सदैव
संपते त्याच्या मायाळू बाहूत
भटकंती दिवसभराची

ओळखतात मोहल्ल्यातल्यांना
कुत्री कसायांची हिंसक
जात नाहीत अंगावर करून चाल
अंधारातही लोडशेडिंगच्या
घालतात गराडा नवख्याला
करतात पळता भुई थोडी



खाल्ल्या अन्नाला जागणारे
बघितले इमानीपण कुत्र्यांमधले
की, थरारतो जीव
आठवून कृतघ्नता माणसांमधली

रमझान, बकर ईदेला
सजतो मोहल्ला नवरीसारखा
विसरून सालभरातले काबाडकष्ट
घमघमतो वारा अत्तराचा सर्वत्र

जोपासतो मोहल्ला उदरात
खाणाखुणा गतकालाच्या ठळक
कब्रस्तान टेकडीवरचे जुनाट
कबरी कब्रस्तानातल्या नेटक्या
चिंचवृक्षे कबरींवरची उंच

साठवून डोळ्यांत चिंचवृक्षे
जमाखर्च पिढ्या न् पिढ्यांचा
उभी भक्कमपणे वेस मानसिंग
घेऊन गवत डोक्यावर पोपटी.
गरीबशाह बाबांच्या दर्ग्यातला
वारा सुवासिक अगरबत्त्यांचा
ओततो उभारी शिणावल्या देहात नवी.

भांडणानंतरच्या एकोप्यात
सापडली बिजे उदारतेची
जुंपले कामाला लग्नकार्यात शत्रू कट्टर
पाण्यात एकमेकांना बघणारे.
माणसे काही खुन्नसखोर
काही शब्दाला जागणारी
कापली नाही मोहल्ल्याने
रसद विषयांची कवितेला लागणारी
□

# रॉय किणीकर

**Roy Kinikar**

ही रात्र आजची पुन्हा न भेटायचे
हे दार आतुनी पुन्हा न लागायाचे
मिटू नकोस डोळे अर्ध्यावर मिटलेले
पुसू नकोस ओघळ स्वप्नांचे फुटलेले ॥

हा असा राहू दे असाच खाली पदर
हा असा राहू दे असाच ओला अधर
ओठात असू दे ओठ असे मिटलेले
डोळ्यात असू दे स्वप्न निळे भरलेले ॥

काळोख खुळा अन् खुळीच काळी राणी
संकोच मावला मिठीत सुटली वेणी
अंजिरी चिरी विस्कटे सुटे निरगाठ
ओठात चुंबने भरली काठोकाठ ॥

चांदणे सांडले गालावरती चिंब
पदरात झिरपले पुनवेचे प्रतिबिंब
गुद्मरली काजळ काठावरची धुंदी
कळवळली हिरवी तळटाचेची मेंदी

*रॉय किणिकर*

अनुराधा पोतदार

**Anuradha Potdar**

एक पुरुष हवा आहे!
या घराला एक आडदांड पुरुष हवा आहे

बटणं सापडत नाहीत म्हणून,
आरडा ओरडा करून,
घर डोक्यावर घेणारा,

आमटीला फोडणी खमंग पडली
म्हणून खुषालून जाणारा

केसांतून बोटे फिरली की,
बाळ होऊनं कुशीत घुसणारा

दमदार पावलांनी - तिन्ही सांजेचा,
केविलवाणा अंधार उधळून लावणारा
पुरुष हवा आहे

या घराला - एक आडदांड पुरुष हवा आहे

नाही हे मी म्हणत नाही
या भिंतीच म्हणून राहिल्यात केव्हापासून

*अनुराधा पोतदार*

# सुधीर मोघे

क्षणोक्षणी चुका घडतात
आणि श्रेय हरवून बसतात
आपल्याच रिकाम्या ओंजळी आपल्याला
फार काही शिकवीत असतात
कणभर चुकीलाही
आभाळाएवढी सजा असते
चूक अन् शिक्षा यांची काधी
ताळेबंदी मांडायचीच नसते
एक कृति, एक शब्द
एकच निमिष युकतं-हुकत
उभ्या जन्माच्या चुकामुकीला
तेवढं एक निमित्त पुरतं
अखेर हे सारं घडतं
केवळ आपण काही शिकण्यासाठी
आपण मात्र शिकत असतो
पुन्हा पुन्हा चुकण्यासाठी !

दाटून आलेल्या संध्याकाही
अवचित सोनेरी ऊन पडतं
तसंच काहीसं पाऊल न वाजवता
आपल्या आयुष्यात प्रेम येतं
शोधून कधी सापडत नाही
मागून काधीच मिळत नाही
वादळ वेडं घुसतं तेव्हा
टाळू म्हणून टळत नाही
आकाश, पाणी, तारे-वारे
सारे सारे ताजे होतात
वर्षांच्या विटलेल्या बधीर मनाला
आवेगांचे तुरे फुटतात
संभ्रम, स्वप्नं, तळमळ-सांत्वन
किती किती तऱ्हा असतात
साऱ्या सारख्याच जीवघेण्या
आणि खोल जिव्हारी ठसतात
प्रेमाच्या सफल-विफलतेला
खरं तर काहीच महत्त्व नसतं
इथल्या जय-पराजयात
एकच गहिरं सार्थक असतं
मात्र ते भोगण्यासाठी
एक उसळणारं मन लागतं
खुळ्या सोनेरी उन्हासारखं
आयुष्यात प्रेम यावं लागतं

# राग माला : सुधीर मोघे

*हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतामधल्या काही मुख्य रागांवर कवी सुधीर मोघे यांनी कविता लिहिल्या आहेत*

*प्रत्येक रागाचा गाभा , स्वभाव , त्याच्याशी निगडित भावना आणि संदर्भ, निसर्ग , दिवसाची वेळ, या सगळ्याच गोष्टी नेमक्या आणि थोड्याच शब्दात इतक्या सुंदरपणे मांडणारी मोघ्यांची हि रागमाला अद्वितिय आहे.*

*या प्रत्येक कवितेबरोबर त्या रागाचे* Youtube *वर असलेले माझे सगळ्यात आवडते रेकॉर्डिंग मी निवडले आहे.*

ऐन दुपारचा
वैशाख वणवा
अजून पुरता निवलेला नसतो

धड ना दुपार
धड ना संध्याकाळ
असला एक मधलाच प्रहर येतो

उन्हाच्या तीव्र मध्यमाची
देहावर जडलेली असते भूल
संधिप्रकाशाचा
कोमल ऋषभ
त्यातूनच देत असतो चाहूल

त्रयस्थ, परक्या आकाशातून
झरत असते
एक नावगावविरहित बेचैनी
ती बेचैनी घेते स्वराकार
त्या आकाराचं नाव -
'मुलतानी' ।

https://www.youtube.com/watch?v=5Fa4NSuvfXM

Raag Multani – Pandit Jasraj

पश्चिमेची लाली हलके हलके
काळोखाच्या काजळात
भिनत जाते

कुठल्या कुठल्या आठवणी जागवीत
तिन्हीसांजेची
कातर वेळ येते

क्षितिजाचा षड्ज धूसर होतो
दाटून येतं
एकटेपण

घर असूनही बेघर व्हावं तसं
एक विचित्र
अधांतरीपण

कधी आक्रंदन, कधी रूखी आर्तता
तर कधी
मनस्वी रुसवा
शृंगाराच्या ठिणगीतूनदेखील
झिरपत रहातो
एक विरागी गारवा,

-उंहुं

विरागी 'मारवा'

https://www.youtube.com/watch?v=5xIaHgPZf0M

Raag Marwa By Pandit Jasraj

तिन्हीसांज संपते
क्षितिजही स्थिरावते

रात्र मंद पाऊली
दहा दिशांस व्यापते

व्याकुळता .... बेचैनी
हुरहुरती आर्तता

व्यथेस लागते नवी
अनोळखी उदात्तता

भेटते असीम गूढ
क्षणभंगुर मृण्मया

दीप जसा श्वासातुन
परिमळता ‘पूरिया’

https://www.youtube.com/watch?v=mSfbe2swHuU

Raag Puriya – Pandit Bhimsen Joshi

दिवेलागण होते
पूर्ण रात्र येते

आता नसते बेचैनी, नसतं आक्रंदन
असतं केवळ चढत्या रात्रीचं निवांत आश्वासन

आणि एक नितांत शांतपण
अथांग... खोल... अपार
जसं माणसाचं मन

स्वरांच्या बोलीत
यालाच म्हणतात, 'यमन'

https://www.youtube.com/watch?v=S0ioBZItZ2A

Raag Yaman : Pandit Bhimsen Joshi

तारे संथ शांत... वारे मंद मंद
चंद्र फिका फिका... थोडा केशरी, बेधुंद

चांदण्याचा झिलमिलता प्रकाश
मधानं मंतरलेला

नदीवर... वाटेवर... झाडांवर... पहाडांवर
नीटसपणे अंथरलेला

कोमल स्वरासारखी रात्र
आत्ममग्न जळवंती

तृप्त, आर्त, संयत
जणू हळवी 'जयजयवंती'

https://www.youtube.com/watch?v=HkmdMruB_Ms&t=194s

Raag Jaijaiwanti : Pandita Kishori Amonkar

ऐन रात्री रातराणी
भर ज्वानीमध्ये येते

प्रीती अबोल, लाजरी
सज्ज झुंझावया होते

हट्ट भोळे, किंतु खुळे
राग लटके फसवे

वरि 'नको नको' - परि
आत सारे काही हवे

खेळ पाठशिवणीचा
कैक युगांचा पुराणा

झुलवुनी भुलविते
असा अनाडी 'अडाणा'

https://www.youtube.com/watch?v=aPNCZIVj6g0

Pandita Malini Rajurkar

तारे दुरावतात ... ज्योती अधुऱ्या होतात
मध्यरात्रीचे अखेरचे क्षण मिठीमध्ये उरतात

स्वप्नात असतानाच
त्या स्वप्नाचं यावं पुरतं भान
तशी कुठेतरी
आत आत... जागी होते जाण

काळोखाच्या काळजाला व्हावा
उजेडाचा दंश
तसा असतो दुखरा, गहिरा
जागृत 'मालकंस'

https://www.youtube.com/watch?v=-HXSIDYYw28

Raag Malkauns : Pandit Kumar Gandharva

https://www.youtube.com/watch?v=7JF9EBTpni4&t=9s

Raag Sampoorna Malkauns : Pandita Kishori Amonkar

मध्यरात्र संपलेली नसते
उत्तररात्र आलेली नसते
अशा मुश्किल वेळी रात्र हळुवार हळवी होऊन जाते

कधी असते विरहिणी
कधी मत्त कामिनी
पण सारे भाव मृदु... इथली आगदेखील चंदनी

ललित, कोमल, रंगीली
जणू साक्षात् वागीश्वरी
स्वरांच्या आवेगी चुंबनानं बहरते 'बागेश्री'

https://www.youtube.com/watch?v=9A2i6cVYq7g

Raag Bageshri – Pandit Jasraj

हलके हलके... प्रौढ गंभीर उत्तररात्र येते
पृथ्वी, आकाश, अवकाश, तारांगण
सारे एकाकार होते

सृजनामागचा अनादि ॐकार
तेव्हा,
त्रिखंडात घुमत असतो

मनाला फुटतात असंख्य आरसे
देह प्राणात भिनून जातो
अशा वेळी...
नीरवताही होते
तपस्व्याचं मौन जरतारी

त्या मौनातून
उमटतो हुंकार
आणि रूप घेतो... 'दरबारी'

https://www.youtube.com/watch?v=oF2hZcbBRlM

Raag Darbari Kanada – Pandita Veena Saharsrabuddhe

उत्तररात्रही निरोप घेते, ओंजळ रितीच राहाते
लाभाहूनही हरपलेल्याची
हुरहूर दाट होते

कोण जाणे,
भविष्यात असेलसुद्धा कदाचित.
स्वप्नांची पूर्तता
या क्षणी मात्र, कोमल धैवताची
असीम आर्तता

भक्ति असो - रति असो
बाण उरतोच जिव्हारी
जिवाला जडते अनिवार ओढ
तिचंच नाव... 'आसावरी'

https://www.youtube.com/watch?v=92e9eKiOr8w

Raag Asavari : Pandit Bhimsen Joshi

पहाटेचा गहिरा प्रहर... सारं धूसर धूसर
भस्मचर्चित सांबासारखं शुचिर्भूत चराचर

सुगंधानं तेजाळतो गाभाऱ्यातील अंधार
घणघणणाऱ्या घंटांमधून दरवळतो गंधार

प्रीतीच्या आर्ततेत देखील उमटतो,
एक विरक्त गौरव

आरक्त उषेला जागवीत येतो
आदिराग 'भैरव' !

https://www.youtube.com/watch?v=JwqucNCXlAA

Raag Bhairav : Pandita Gangubai Hangal

कालनिरपेक्षशी
एक ही रागिणी
हृदय संमीलनी
होय संवादिनी

प्रणयि साफल्य हो
विरहि संवेदना
गहन तम साचता
हीच ये सांत्वना

साधका मुक्ति,
कैवल्यही भेटवी
भगवती 'भैरवी'
भगवती 'भैरवी' !

https://www.youtube.com/watch?v=1pTfgLtLdIo

Raag Bhairavi : Pandit Bhimsen Joshi

एक सांगशील,
आपले रस्ते अवचित कुठे; असे जुळले ?
आपल्याच नादात चालताना
हे देखणे वळण कसे भेटले ?

क्षणाभोवती
ही कसली अनोखी रंगत खुलते आहे ?
जगणं व्हावं गाणं
अशी स्वरांची संगत जुळते आहे

पण खरं सांगू ?
या वाटांचं हे असं भेटणं बरं नव्हे
जीवघेणं उत्कट असेल
तरीही ते खरं नव्हे

तुझी दिशा पूर्वीच निश्चित
ती बदलणं हिताचं नाही
माझ्यापुरतं बोलायचं
तर मला माझी दिशाच नाही

तुझ्या संगतीत
आनंद आहे, आश्वासन आहे, दिलासा आहे
माझ्या मात्र स्वप्नांच्या हातात
फक्त भंगण्याचाच वसा आहे

म्हणून म्हणतो,
अशा आटांनी मुळात एकत्रच येऊ नये
जीव जडवून, चटका लावून
निदान दूर होणं तरी असू नये
पण अशाच वेळी कळून येतं
आपण आपले मालक नसतो
रस्ते आपली दिशा आखतात
आपण फक्त चालत असतो

तुझ्या माझ्या सहवासाचा योग
आपल्या कुंण्डलीत कुठून लाभला ?

ही नारिंगी संध्याकाळ
ही सुखाची सफर
हा झकास बेत कसा जमला ?

या संगतीची तऱ्हाच वेगळी
हिला कसलीच बंधनं नाहीत
संकेत-अपेक्षा
आणा शपथा
असले कुठलेच उपचार नाहीत
क्षितिजावरची ही रंगत पाहिलीस ?
तशीच ही सगतही सहज खुलते
तितकीच उत्कट
तितकीच खुळी
तशीच मनात फुलत राहते
कदाचित् एखाद्या खुळावल्या क्षणी
भेटतीलही ओठ, जुळतीलही हात
किंवा कदाचित
कळणारही नाही
केव्हा संपून गेली वाट,
कुणी सांगावं ?... पुढच्याच क्षणी
पुसलंही जाईल हे वडं गीत
निरोपाच्या वळणावर
दर्वळत ठेवून
एक खोलसा उसासा
एक हलकंसं स्मित

# आरतीप्रभु

# रंग

ठेव रे विश्वास थोडा, श्वास दे घेऊं मला,
तापलेली रे तनू हीः वस्त्र दे उतरूं मला.
पौर्णिमा उधळूं निघाल्यें – सर्व रे सोळा कळा;
मी न आतां राहिल्यें रे पूर्विची ती चंचळा
पोक्त मी झाल्यें अता रे डाव मांडूं वेगळाः
हार किंवा जीत होणें हें नको रे आजला.
संपणारा जो क्षणार्धीं राहणें अर्धाचि वा
खेळ ऐसा खूप झाला, रंगला अन् संपला.
एक ऐसा डाव मांडूं, रंग झेलूं आंतला,
पावसाळी रंग बोलूंः मोर जैसा रे निळा.
रंग जर का खेळतांना सर्वही आले सरूं,
सात रंगांतून उरल्या अंतरंगा ये धरूं.
ठेव रे विश्वास थोडा, श्वास दे घेऊं मला,
तापलेली रे तनू हीः वस्त्र दे उतरूं मला.

## ऊनओल्या

ऊनओल्या गूजगप्पा, ऊनओला अन् अबोला,
ऊनओलीं तीं उन्हें अन् ऊनओला पावसाळा.
मंद झोपाळे हलावे, ऊन पायीं चिकणमाती,
उंचसे झोके चढावे, किरण गावे हातिं ओला.
सर्व देते. . . आणि येतें श्रांत डोळां मीठपाणी,
सर्व घेतों म्हणत 'राणी' : पेट घे कापूर ओला.
सर्व देतां येत होतें आणि देतां येत नव्हतें,
ती असोशी दाट ओली, पावसाळी तो उन्हाळा.
स्पर्श काळोखास करणें जीवघेणें वाटलेलें,
एक ओलासा उसासा तापल्या कानांत आला.
दिवस आले, दिवस गेले, संपले कांही ऋतू अन्
संपला काळोख नाही ऊनओला जांभळा.
श्रावणाच्या अन् उन्हाचीं झुंबरें मीं लावलेलीं
आणि आषाढी सरींचीं तोरणें माझ्या घराला.

# जाईन दूर गावा

तेव्हा मलाच माझा वाटेल फक्त हेवा,
घरदार टाकुनी मी जाईन दूर गावा.
पाण्यांत ओंजळीच्या आला चुकून मीन
चमकून हो तसाच गाण्यांत अर्थ जावा.
शिंपीत पावसाळी सर्वत्र या लकेरी
यावा अनाम पक्षी, स्पर्शू मलाच यावा.
देतां कुणी दुरून नक्षत्रसे इषारे
साराच आसमंत घननीळ होत जावा.
पेरून जात वाळा अंगावरी कुणी जो,
शेल्यापरी कुसुंबी वाऱ्यावरी वहावा.
तारांवरी पडावा केव्हा चुकून हात :
विस्तीर्ण पोकळीचा गंधार सापडावा.
तेव्हा मलाच माझा वाटेल फक्त हेवा,
घरदार टाकुनी मी जाईन दूर गावा.

# शंकर वैद्य

**Shankar Vaidya**

## जेव्हा येतेस ओथंबून...

माझी भूक तर तुला सर्व दिशांनी
एकदम पाहण्याची
पण,... तू समोर असतेस तेव्हा
दिसतेस अर्धीच;
पाठमोरी असताना तुझा चेहरा
झालेला असतो दृष्टीआड,
चेहऱ्याला बघताना
                    दिसत नसतात पाय,
तर पाय दिसत असताना
                    दिसत नसतात डोळे !
केवढी मर्यादा आहे ही माझ्या दृष्टीची !

पण जेव्हा तू येतेस ओथंबून
जातेस अंगभर पसरत
पाण्यात पडलेल्या केशरी रंगासारखी
मिसळतेस साखरेसारखी कणाकणात
तेव्हा तू कळू लागतेस सारी स्पर्शातून
तुझ्या शरीराच्या दिशा विरलेल्या असतात
तुझ्यातच
येथे तू असतेस दिशातीत माझ्यासह;
जाणवत असते केवळ सूक्ष्म उजळलेलं
मीलन-भान :
दोन्ही मने एकतान

# निराशेचा डंख

मनाला निराशेचा डंख होतो तेव्हा
अंगाला मुरड घालीत तडफडत जळणाऱ्या कागदासारख्या
दिशा काळवंडत जातात,
आयुष्यातल्या अनेक जुन्या निराशांच्या नागिणी
लपूनछपून सरकतात बिळांतून
आणि टाकीत राहतात आपले विषारी फूत्कार
त्या झणझणीत वेदनेचा दाह वाढविण्यासाठी.

प्रत्येक नव्या निराशेला तोंड देताना
पहिल्या झटापटीत माझी रक्तबंबाळ माघार
ही ठरलेलीच असते,
पण त्याच वेळी मन बांधीत असते मोर्चे
प्रतिहल्ल्याचे,
त्या निराशेला पकडून काबूत आणण्याचे,
तिला आपलेसे करण्याचे,
आपलेसे करून माझ्या तालावर खेळवीत ठेवण्याचे
आणि त्यात मी यशस्वी होतोही !

खोटे नाही ! हा माझ्या गारूड्याच्या टोपलीतला
निराशेचा तुकतुकीत काळा नाग पाहा !
मी डिवचताच तो झपकन फणा काढतो,
पुंगी वाजवताच डोलतो,
मी त्याला अंगाखांद्यावर खेळवतो
त्याचा आणि मुंगसाचा खेळ दाखवतो —
भर रस्त्यावर,
चक्क बासरी आणि डमरूच्या तालावर !
मला फक्त एवढेच कळलेले नाही, की



मी त्याला खेळवीत आहे
की माझ्याच टोपलीत राहून
तोच मला खेळवीत आहे ?

— साप डसून गारुडी दगावल्याची उदाहरणे
नाहीतच असे नाही !

## मैत्री

तुझी-माझी मैत्री व्हावी,
हो, खरंच 'मैत्री',

''पण मैत्री म्हणजे नक्की काय?'' विचारतेस, तर
मला जरा वेळ दे, म्हणजे मी ते सांगण्याचा प्रयत्न करतो :

मैत्री म्हणजे... म्हणजे...
म्हणजे, तुला माझ्याविषयी काहीतरी वाटत राहावं आपुलकीचं
आणि अर्थात मलाही तुझ्याविषयी, तसंच,
म्हणजे की, आपणांस वाटत राहावी काळजी, एकमेकांची,
म्हणजे जशी काळजी घेतली जाते आपल्या शेताची,
राहत्या घराची,
किंवा काळजी घेतो आपण आपल्या शरीराची,
आपल्या मनाची,
आपली, आपली स्वतःची,
आपल्या कपड्यालत्त्यांची, वस्तूंची, चपलांची,
पाळण्यात झोपलेल्या मुलाची,
फुलदाणीत ठेवलेल्या फुलांची
घरात केवळ तांब्याभर उरलेल्या पाण्याची
आगपेटीत उरलेल्या शेवटच्या काडीची,
मैत्री म्हणजे,... म्हणजे, मला खूप आधार वाटावा तुझा;
जसा पक्ष्यास झाडाचा, रोपास कुंडीचा,
मी बोलतो माझ्याशी, माझ्या मनाशी, विचार करताना...
अनुभवताना,
तसंच बोलता यावं मला तुझ्याशी,
तू अस, तू नस, मी बोलत राहतोही तुझ्याशी
वाटतं, कधी फिरतो-वागतो, तू म्हणूनच जगात !

एवढं सारं सांगूनही मला देता आलेलं नाही तुझ्या
साध्या प्रश्नाचं उत्तर, 'मैत्री म्हणजे काय ?'

मला वाटतं, ते देताच येऊ नये तूर्त, कारण —
मैत्री असते एक पूर्णतेस गेलेली शांत सुखदायी गोष्ट !
तिला असते सुरुवात, असते वाढ, असतात वळणं,
असतात अडथळे;
पण ते असतं परस्परांशी संवादी जगणं
परस्परांसाठी, स्वतःसाठी म्हणून परस्परांसाठी

मैत्री असते आपली स्वतःची निर्मिती
एका नव्या नात्याची...

तू ऐकत राहिली आहेस इतका वेळ,
आपुलकीनं जाणून घेत, विचार करीत गंभीरपणे,
— हीच कदाचित सुरुवात असेल मैत्रीची !

# पु शि रेगे

# सूर्य माझा

सूर्य माझा
शास्ता,
धाता;
तो करतो मला
पुष्ट, पुंसक,
आर्यांच्या खिल्लारांतिल
धृष्ट पुंगवासारखा—
विस्तवी.

प्रवाही
तेज त्याचें
फुंजतें
माझ्या धमन्यांतून—
रक्तामध्यें
रक्त जेथें घुसळतें,
बांड मनाचे
बांध
फुंफाटतात.

सूर्य माझा
होतो डोळा,
तुझ्या डोळ्याच्या
आभाळांतिल
थंड काळा

ढवळुन प्याया
गोळा.

अन् देतो कर—
सूर्य माझा
मला कर
छिद्राछिद्रांतून
त्वचेच्या
अणकुचीदार भाल्याचे,
वक्षावर ज्यांचें
भोग्य तुझ्या
नव्या दंवाच्या
पुन्हां चांदण्या
लक्ष्य.

## ३४ त्रिधा राधा

आकाश निळे तो हरि
अन् एक चांदणी राधा -
बावरी
युगानुयुगिंची मन-बाधा.

विस्तीर्ण भुर्श गोविंद
अन् क्षेत्र साळिचे राधा -
स्वच्छन्द
युगानुयुगिंची प्रियंवदा.

जलवाहिनि निश्चल कृष्ण,
बन झुकले काठी राधा -
विप्रश्न
युगानुयुगिंची चिर-तंद्रा.

## ४३ रेषा

रेषा ...
मिळत्या, उलगडत्या,
अधिकाधिक उमजवित्या,
उमजत्या,
अवखळ साखळत्या,
मोकळ्या
हलके हिंदोळत्या,
लवचिक गिरकीत
घन संयत घोळवित्या,
भरलेपण भरहर्षे
भोगवित्या ...

रेषा ...
रेषांतुन तू,
लववित किरण उभे,
मनवित छाया
गहिऱ्या
अवघडत्या.

# ना धो महानोर

२.

ह्या नभाने ह्या भुईला दान द्यावे
आणि ह्या मातीतुनी चैतन्य गावे
कोणती पुण्ये अशी येती फळाला
जोंधळ्याला चांदणे लखडून जावे

ह्या नभाने ह्या भुईला दान द्यावे
आणि माझ्या पापणीला पूर यावे
पाहता ऋतुगंध कांती सांडलेली
पाखरांशी खेळ मी मांडून गावे

गुंतलेले प्राण ह्या रानात माझे
फाटकी ही झोपडी काळीज माझे
मी असा आनंदुनी बेहोष होता
शब्दगंधे, तू मला बाहूत घ्यावे !

पाऊस अल्लद
स्वप्नातल्या हिनकळचा सावलीसारखा.
दिवसाआधीच्या झांजरझापीतला.
झाडांच्या फांद्यांवर; थेंबथेंब पानांवर
अल्लद स्वप्नातला, पाऊस झोपेतला.

पाऊस पक्ष्यांच्या पंखांवर निसटता
हलका, हेलकावता, थेंबाथेंबीचा
पिवळचा जर्द पहाटेच्या
अंगणात पाखडल्या चिमण्यांच्या
चिवचिव चोंचीतल्या गाण्यातला.

पाऊस चढतीचा
आषाढ गढतीचा
दुपारच्या निःशब्द तळयाच्या पाण्यावर
संथ सरपटता
केतकी कबूतरी पंखांच्या दाटीत
गर्भार गढतीचा.—पाऊस चढतीचा.

पाऊस उतरत्या सांजेच्या काळोखात
गडदगर्द गहिरा
डोंगर कठडयाशी झिंगून काजळी काळोख पिणारा
निमूट झोपलेल्या खोऱ्याखोऱ्यांवर
विक्राळ बरळता मदमस्त पाऊस.

पाऊस रात्रीचा
कभिन्ह-माध्यान्ही
धसमुसळा, काळा, वैऱ्यासारखा.
उध्वस्त डोळयांतल्या सांदीसांदीतून
खिंडार पाडणारा.
विजेच्या विळख्यांनी वेटाळत जाणारा...
—सर्पाहून गहिरा.

# बा भ बोरकर

## ४५. मज लोभस हा इहलोक हवा

स्वर्ग नको सुरलोक नको मज लोभस हा इहलोक हवा
तृप्ति नको मज मुक्ति नको पण येथिल हर्ष नि शोक हवा

शोक हवा परि वाल्मिकिच्या परि सद्रव अन् सश्लोक हवा
हर्ष हवा परि स्पर्शमण्यापरि त्यांत नवा आलोक हवा

शंतनुचा मज मोह हवा अन् ययातिचा मज देह हवा
पार्थाचा परि स्नेहविकंपित स्वार्थ सदा संदेह हवा

इंद्राचा मज भोग हवा अन् चंद्राचा हृद्रोग हवा
योग असो रतिभोग असो अतिजागृत त्यांत प्रयोग हवा

आयु हवें आरोग्य हवें यशभाग्य तसा प्रासाद हवा
श्लाघ्य हवें वैराग्य तथास्तव त्यांत विरोध विषाद हवा

तापासह अनुताप हवा मज पापासह अभिशाप हवा
शिळांत पिचतां जळांतुनी मज निळा निळा उःशाप हवा

मार्क्सांचा मज अर्थ हवा अन् फ्रॉइडाचा मज काम हवा
या असुरां परि राबविण्या घरिं गांधींचा मज राम हवा

लोभ हवा मज गाधिजमुनिचा अखंड आंतर क्षोभ हवा
पराभवांतहि अदम्य उज्ज्वल प्रतिभेचा प्रक्षोभ हवा

पार्थिव्यांतच वास हवा परि दिव्याचा हव्यास हवा
शास्त्रांचा अभ्यास हवा परि मानव्याचा ध्यास हवा

विश्व हवें सर्वस्व हवें अन् मृत्यु समोर सयंत्र हवा
शरांत परि ही विव्हळतां तनु उरांत अमृतमंत्र हवा

हविभुक् सुरमुख मी वैश्वानर नित्य नवा मज ग्रास हवा
हें सुख दुर्लभ वाढविण्या मज चौऱ्यांशींत प्रवास हवा

# ७६. हळद लावुनी आलें ऊन

हळद लावुनी आलें ऊन, कुंकुमाक्षता फुलांमधून
झाडांमधुनी झडे चौघडा, घुमतें पाणी लागुन धून
नाचुन मिटली श्रावणधार, शीतल पान्यापरिस दुपार
निळींतुनी हिरव्यांत भुरळलीं पिवळीं सोनपिसोळीं चार
उभार साळी भरून दूध, हवेंत सजणी कापुरऊद
शेरवडाच्या ढवळ्या पानीं उधळे ऋतुचें लक्ष बिरूद
लावण्याचा लागुन बाण तृप्तीलाही फुटे तहान
मला खोवूं दे तुझ्या कुंतलीं एकच यांतिल पान लहान

# उदकावर खेळाव्या वाफा

उदकावर खेळाव्या वाफा, होड्यांच्या बदकांचा ताफा
रूप बघाया जरा झुकावा काठीं अन् फुलता कुडचाफा
कळकवनाचा हिरवा शेपा धूसर क्षितिजीं गर्द फुलावा
निळ्या गिरींतुन अन् जास्वंदी लवलवणारा तुरा खुलावा
तणाफुलावर गीत झुलावें, प्रीत पळावी होउन चानी
तिने थबकुनी वळतां मागे कंप भरावा क्षणभर पानीं
झाडीमधल्या रस्त्यावरती उघडावा किरणांचा पंखा
कुणग्यांमधल्या गंजीवरती उजळाव्या सोन्याच्या लंका

ओळखिचेंसे अनोळखी कुणि नकळत अंतर मंतरणारें
भेटावें मज वळणावरती उन्हांत दवसें मावळणारें

●

३०-१२-६०

## अभंग

आयुष्याची आता झाली उजवण,
येतो तो तो क्षण अमृताचा.

खडे, गोटे मज झाले चिंतामणी,
दिसे तें तें पाणी गंगोदक.

लवे वृक्षवल्ली : कल्पद्रुमावली,
इंद्ररंगावळी मेघमाला.

वेल्हाळ पाखरें : गंधर्व–किन्नरें,
वाहनें वनचरें अमरांचीं.

जें जें भेटे तें तें दर्पणींचें बिंब :
तुझें प्रतिबिंब लाडेंगोडें.

उमटल्या शब्दी नवीन पहाट,
पावलांत वाट माहेराची.

अंतर्बाह्य आता आनंदकल्लोळ,
श्वासीं परिमळ कस्तुरीचा.

सुखोत्सवी अशा जीव अनावर :
पिंजऱ्याचें दार उघडावें.

●

## अभंग

संधिप्रकाशांत अजून जो सोने
तों माझीं लोचनें मिटों यावीं;

असावीस पास, जसा स्वप्नभास,
जीवीं कासावीस झाल्याविण;

तेव्हा सखे आण तुळशीचें पान,
तुझ्या घरी वाण त्याची नाही;

तूच ओढलेलें त्यासवें दे पाणी,
थोर ना त्याहुनी तीर्थ दुजें;

रंभागर्भी वीज सुवर्णाची कांडी
तशी तुझी मांडी देई मज;

वाळल्या ओठां दे निरोपाचें फूल :
भुलीतली भूल शेवटली;

जमल्या नेत्रांचे फिटू दे पारणें,
सर्व संतर्पणें त्यांत आलीं.

●

# ग्रेस

तू नाचत जाशी पोरी
तवं काया हळदी गोरी
वारा उनाड;
उचलील झाड;
ही कोण लाजते नवरी !

तनुवेल बहरली मुक्ता
तंद्रीत स्तनांची सत्ता
वणव्यात रान;
आभाळगान;
स्वप्नांत हरवली शांता

क्षितिजास समजले गाणे
तव देह स्वरांचे लेणे
तळहात मंद;
तळपाय छंद;
जान्हवी घेत की वळणे...

चंद्रमाधवीचे प्रदेश

## निळाई

असे रंग आणि ढगांच्या किनारी
निळे ऊन लागे मला साजणी
निळे घाटमाथे निळ्या राउळांचे
निळाईत माझी भिजे पापणी

निळ्याशार मंदार पाऊलवाटा
धुक्याची निळी भूल लागे कुणा
तुला प्रार्थनांचे किती अर्घ्य देऊ
निळ्या अस्तकालीन नारायणा

निळेगार वारे जळाची शिराणी
निळ्या चंद्रओवीत संध्या झुले
निळे दुःख चोचीत घेऊन आली
निळ्या पाखरांची निळी पाउले

निळे सूर आणि निळी गीतशाळा
निळाईत आली सखीची सखी
निळ्या चांदण्याने निळ्या चंदनाची
भिजेना परी ही निळी पालखी

किती खोल आणि किती ओल वक्षी
तुझा सूर्य आणि तुझे चांदणे
प्रागातले ऊन प्राणात गेले
तुझ्या सागराची निळी तोरणे

चंद्रमाधवीचे प्रदेश

## आरती प्रभु

*यह मरतबा बलंद मिला जिस को मिल गया*
*हर मुद्दई के वासते दारो रसन नही*

असे वाटते मृत्यु असतो सख्या रे
सतीच्या खुनासारखा पोरका
जळाच्या भयाने दुभंगून गेली
सुन्या स्वप्नपारावरी द्वारका...

समुद्रावरी मी तुला एकदा रे
दुपारीच वाळूत ओवाळिले
मला शोधणारी रडे अंध विधवा
जिचे गर्भ माझ्या घरी वाढले...

तुझा मंद पावा तुझी दीर्घ राने
तुझी ज्ञानदेवीय जी आर्द्रता
तिच्या सावलीचे निळे चंद्र माझी
पुन्हा मागती का मला संहिता.

असा एक सूर्यास्त अंगावरी ये
मला वाटते मीहि भारावलो
दिवेलागणीच्या तुझ्या खिन्न वेळीच
हे गाव सोडून मी चाललो...

कुणाला म्हणावे तुझ्या मेघमाळा
मला चिंब होऊन रे दाखवा
जुन्या वैष्णवाने घरी आणल्या ना
मला शैव समजून या पादुका

# सुरेश भट

## एवढे दे पांडुरंगा !

माझिया गीतांत वेडे
दुःख संतांचे भिनावे;
वाळल्या वेलीस माझ्या
अमृताचे फूल यावे !

आशयांच्या अंबरांनी
टंच माझा शब्द व्हावा;
कोरडा माझा उमाळा
रोज माधुर्यात न्हावा !

स्पंदने ज्ञानेश्वराची
माझिया वक्षांत व्हावी;
इंद्रियांवाचून मीही
इंद्रिये भोगून ध्यावी !

एकनाथाने मलाही
बैसवावे पंगतीला;
नामयाहाती बनावे
हे जिणे गोपाळकाला !

माझियासाठी जगाचे
रोज जाते घर्घरावे;
मात्र मी सोशीन जे जे
ते जनाईचे असावे !

मी तुक्याच्या लोचनांनी
गांजल्यांसाठी रडावे;
चोख वेव्हारात माझ्या
मी मला वाटून द्यावे !

ह्याविना काही नको रे,
एवढे दे पांडुरंगा !
ह्याचसाठी मांडिला हा
मी तुझ्या दारात दंगा !

# प्रार्थना

गंजल्या ओठास माझ्या धार वज्राची मिळू दे !
आंधळ्या आत्म्यात माझ्या सूर्य सत्याचा जळू दे !

पांगळा बंदिस्त माझा जन्म आकाशून जावो;
वादळी आवेग माझा चार भिंतींना कळू दे !

सारखे सौंदर्य माझ्या कोरड्या गात्री खळाळो;
सारखे अस्तित्व माझे पेटताना वर्दळू दे !

लाभु दे लाचार छाया मोठमोठ्यांना परंतू
तापल्या मातीत माझा घाम मानाने गळू दे !

आणु दे गा वंचकांना क्रूस छद्माचा दयाळा;
रक्त येशूचे परी डोळ्यांत माझ्या साकळू दे !

पूर्तता माझ्या व्यथेची माझिया मृत्यूत व्हावी
जीवनापासून माझ्या या मला मुक्ती मिळावी

वेदनेला अंत नाही अन् कुणाला खंत नाही
गांजणा-या वासनांची बंधने सारी तुटावी

संपली माझी प्रतीक्षा, गोठली माझी अपेक्षा
कापलेले पंख माझे, लोचने आता मिटावी

सोबती काही जिवाचे मात्र यावे न्यावयाला
तारकांच्या मांडवाखाली चिता माझी जळावी

काय सांगावे तुला मी, काय मी बोलू तुझ्याशी
राख मी झाल्यावरी गीते तुला माझी स्मरावी

# शांता शेळके

# निर्वात

गाढ स्नेह असला, तरी कधी येतात असे क्षण
दोघांच्याही मनांमध्ये दाटून येते एकटेपण
व्यक्तित्वाचा मूढ मुखवटा त्याच्यामागे विराट पोकळी
गर्द राने : एकाकी वाटा : चांदण्यात न्हालेली तळी :

तोंड फिरवून बसते आभाळ, बंद होतात दिशा दाही
एकामेकांत शिरायला रस्ताच मुळी सापडत नाही!
शब्द सारे होतात मुके, उग्र नकारांकित मन
ओळखीच्या पोटातली ही अनोळख किती विलक्षण!

आत्म्यांच्या अलौकिक जवळिकीलाही सीमा असतात
कधी नुसते देहावरचेच खाच, खड्डे, डाग दिसतात
अशा वेळी करशील काय? सोडून देशील हातचा हात?
अशरणतेने रडशील, की अभिमानाने असशील ताठ?

उंच कडा मागे उभा... पुढे अथांग दरी भयाण...
स्नेहशून्य निर्वातात सावरशील? झोकशील प्राण?

# बा सी मर्ढेकर

भगुं दे काठिन्य माझें
आम्ल जाऊं दे मनीचें;
येउं दे वाणींत माझ्या
सूर तूझ्या आवडीचे.

ज्ञात हेतूंतील माझ्या
दे गळूं मालिन्य, आणि
माझिया अज्ञात टाकीं
स्फूर्ति-केंद्रीं त्वद्बियाणीं.

राहुं दे स्वातंत्र्य माझें
फक्त उच्चारांतलें गा,
अक्षरां आकार तूझ्या
फुफ्फुसांचा वाहुं दे गा.

लोभ जीभेचा जळूं दे
दे थिजूं विद्वेष सारा,
द्रौपदीचें सत्त्व माझ्या
लाभुं दे भाषा-शरीरा.

जाउं दे कार्पण्य 'मी'चें,
दे धरूं सर्वांस पोटीं;
भावनेला येउं दे गा
शास्त्र-काव्याची कसोटी.

खांब दे ईर्ष्येस माझ्या
बाळगूं तूझ्या तपाचे;
नेउं दे तींतून मातें
शब्द तूझ्या स्पंदनांचे.

त्वत्स्मृतीचें ओळवूं दे
माझिया हातां सुकाणूं;
थोर-यत्ना शांति दे गा
माझिया वृत्तींत बाणूं.

आण तूझ्या लालसेची,
आण लोकांची अभागी;
आण माझ्या डोळियांची
पापणी ठेवीन जागी.

धैर्य दे अन् नम्रता दे
पाहण्या जें जें पहाणें,
वाकुं दे बुद्धीस माझ्या
तप्त पोलादाप्रमाणें;

घेउं दे आघात तीतें
इंद्रिय-द्वारा जगाचे;
पोळुं दे आतून तीतें
गा अतींद्रियार्थ आचें.

आशयाचा तूंच स्वामी!
शब्दवाही मी भिकारी;
मागण्याला अंत नाही,
आणि देणारा मुरारी.

काय मागावें परी म्यां
तूंहि कैसें काय द्यावें;
तूंच देणारा जिथे अन्
तूंच घेणारा स्वभावें!!

न्हालेल्या जणुं गर्भवतीच्या
सोज्वळ मोहकतेने बंदर
मुंबापुरिचें उजळित येई
माघामधली प्रभात सुंदर.
सचेतनांचा हुरूप शीतल;
अचेतनांचा वास कोवळा;
हवेंत जाती मिसळुनि दोन्ही.
*पितात सारे गोड हिवाळा !*

डोकीं अल्‌गद घरें उचलती
काळोखाच्या उशीवरूनी;
पिवळे हंडे भरून गवळी
कावड नेती, मान मोडुनी;
नितळ न्यहारिस हिरवीं झाडें
काळा वायू हळूच घेती;
संथ बिलंदर लाटांमधुनी
सागर-पक्षी सूर्य वेचती;
गंजदार, पांढऱ्या नि काळ्या
मिरवित रंगा अन्‌ नारिंगी,
धक्क्यावरच्या अजून बोटी
साखरझोपेमधी फिरंगी;
कुठे धुराचा जळका परिमल,
गरम चहाचा पत्ती गंध;
कुठे डांबरी रस्त्यावरच्या
भुऱ्या शांततेचा निशिगंध;
ह्या सृष्टीच्या निवांत पोटीं
परंतु लपली सैरावैरा,
अजस्र धांदल, क्षणांत देइल
जिवंततेचें अर्घ्य भास्करा.

थांब ! जरासा वेळ तोंवरी—
अचेतनांचा वास कोवळा;
सचेतनांचा हुरूप शीतल.
*उरे घोटभर गोड हिवाळा !*

दवांत आलिस भल्या पहाटीं
शुक्राच्या तोऱ्यांत एकदा;
जवळुनि गेलिस पेरित अपुल्या
तरल पावलांमधली शोभा.

अडलिस आणिक पुढे जराशी
पुढे जराशी हसलिस;
—मागे
वळुनि पाहणें विसरलीस का ?
विसरलीस का हिरवे धागे ?

लक्ष्य कुठे अन् कुठे पिपासा,
सुंदरतेचा कसा इशारा;
डोळ्यांमधल्या डाळिंबांचा
सांग धरावा कैसा पारा !

अनोळख्याने ओळख कैशी
गतजन्मींची द्यावी सांग;
कोमल ओल्या आठवणींची
एथल्याच जर बुजली रांग !

तळहाताच्या नाजुक रेषा
कुणिं वाचाव्या, कुणीं पुसाव्या;
तांबुस निर्मल नखांवरी अन्
शुभ्र चांदण्या कुणिं गोंदाव्या !

दवांत आलिस भल्या पहाटीं
अभ्रांच्या शोभेंत एकदा;
जवळुनि गेलिस पेरित अपुल्या
मंद पावलांमधल्या गंधा.

**नामदेव ढसाळ**

## । माण्साने

माण्साने पहिल्याप्रथम स्वत:ला
पूर्ण अंशाने उद्‌ध्वस्त करून घ्यावे
बिनधास डिंगडांग धतींग करावी
चरस गांजा ओढावा
अफीन लालपरि खावी
मुबलक कंट्री प्यावी– ऐपत नसेल तर
स्वस्तातला पाचपैसा पावशेर डाल्डा झोकावा
दिवस रात्र रात्रंदिवस तर्रर रहावे
याला त्याला कुणालाही आयभयणीवरून
गाली द्यावी धरून पिदवावे...
माण्साने जवळ रामपुरी बाळगावा
गुपची फरशी तलवार शिगा हॉकी बांबू
ॲसिडबल्ब इत्यादि इत्यादि हाताशी ठेवावे
मागेपुढे न पाहता कुणाचेही डेडाळे बाहेर काढावे
मर्डर करावा झोपलेल्यांची कत्तल करावी
माण्साला गुलाम बनवावे त्याच्या गांडीवर हंटरचे फटके मारावे
त्याच्या रक्ताळ कुल्ल्यांवर आपल्या घुगऱ्या शिजवून घ्याव्या
शेजाऱ्याला लुटावे पाजाऱ्याला लुटावे बँका फोडाव्यात
शेठ–सावकारांची आय झवून टाकावी नात्यागोत्याचा
केसाने गळा कापावा जेवणातून विष घालावे मूठ मारावी
माण्साने कुणाच्याही आयभयणीवर केव्हाही कुठेही
चढावे
पोरीबाळींशी सइंद्रिय चाळे करावे म्हातारी म्हणू नये
तरणी म्हणू नये कवळी म्हणू नये सर्वांना पासले पाडावे

व्यासपीठावरून समग्र बलात्कार घडवून आणावे
रांडवाडे वाढवावेत : भाडखाव व्हावे : स्त्रियांची नाकं थानं
कापून मुड्या गाढवावर बसवून जाहीर धिंडवडे करावेत
माण्साने रस्ते उखनावेत ब्रीज उखडावेत
दिव्याचे खांब कलथावेत
पोलिसस्टेशने रेल्वेस्टेशने तोडावीत
बसेस ट्रेन कार गाड्या जाळाव्यात
साहित्यसंघ शाळा कॉलेजं हॉस्पिटलं विमानअड्डे
राजधान्या इमले झोपड्या वखवखलेल्या भुकाळ वस्त्या
यावर हातबॉम्ब हैड्रोजन बॉम्ब टाकावेत
माण्साने प्लेटो आइन्स्टाइन आर्किमिडीस सॉक्रेटीस
मार्क्स अशोक हिटलर बिटलर कामू सार्त्र काफ्का
बोदलेअर रेम्बो इझरा पाउंड हापकिन्स गटे
दोस्तोव्हस्की मायकोव्हस्की मॅक्झीम गॉर्की
एडिसन मेडिसन कालिदास तुकाराम व्यास शेक्स्पीअर
ज्ञानेश्वर वगैरे वगैरेंना त्यांच्या शब्दांसकट गटाराचे
मेनहोल उघडून त्यात सलंग सडत ठेवावे
येसूच्या पैगंबराच्या बुद्धाच्या विष्णूच्या वंशजांना फाशी द्यावे
देवळे चर्च मशिदी शिल्पे म्युझियम्स कुस्करून टाकावे
पंड्यांना बंड्यांना तोफेच्या तोंडी द्यावे त्यांच्या रक्ताने
भिजलेले रुमाल शिलालेखावर कोरून ठेवावेत
माण्साने जगातील सर्व धर्मग्रंथांची ईश्वरग्रंथाची पाने
फाडून हागायचे झाल्यावर त्यांनी बोचे साफ करावेत
कुणाच्याही कुंपणाच्या काट्या काढाव्यात आत हागावे मुतावे गाभडावे

मासिक पाळी व्हावे शेंबूड शिंकरावे
घाणेंद्रिये जास्त घाण करतील असे शेवटून घ्यावे
जिकडे तिकडे वरखाली खालीवर मध्ये नरकच नरक
उभारावेत... अश्लील अत्याचारी व्हावे माण्सांचेच
रक्त प्यावे डल्ली सल्लीबोटी खावी चर्बी वितळवून प्यावी
टीकाकारांचे गुडसे ठोकावेत हमनदस्ती पाट्यावर
वर्गयुद्धे, जातियुद्धे, पक्षयुद्धे, धर्मयुद्धे, महायुद्धे
घडवून आणावी पूर्ण रानटी हिंस्त्र आदिम बनावे
बेलाशक अराजक व्हावे
अन्न न पिकविण्याची मोहिम काढावी अन्नावाचून पाण्यावाचून याला त्याला
स्वत:लाही मारावे रोगराई वाढवावी वृक्ष निष्पर्ण करावेत कुठलेही
पाखरू न गाईल याची दक्षता घ्यावी माण्साने विव्हळत किंकाळत
लवकरात लवकर मरण्याचे योजावे
हे सारे सारे विश्वव्यापू गळूप्रमाणे फुगू द्यावे
अनामवेळी फुटू द्यावे रिचू द्यावे
नंतर उरल्यासुरल्यांनी कुणालाही गुलाम करू नये लुटू नये
काळागोरा म्हणू नये तू ब्राह्मण तू क्षत्रिय तू वैश्य तू शूद्र असे हिणवू नये
कुठलाही पक्ष काढू नये घरदार बांधू नये नाती न मानण्याचा
आयभैन न ओळखण्याचा गुन्हा करू नये
आभाळाला आजोबा अन् जमिनीला आजी मानून त्यांच्या कुशीत
गुण्यागोविंदाने आनंदाने राहावे
चंद्रसूर्य फिके पडतील असे सचेत कार्य करावे
एक तीळ सर्वांनी करंडून खावा माण्सावरच सूक्त रचावे
माण्साचेच गाणे गावे माण्साने.

# इंदिरा संत

**Indira Sant**

## सतार

जाळीदार झापणाखालीं
झुलत असेलेला अतिमंद दिवा
सभोंवारच्या भिंतीवरून झुळझुळणाऱ्या
पाण्याच्या नाजूक लाटा – आराम खुर्चीवरील
अर्धोन्मीलित नेत्रांवर ग्लानीचें शिंपण करणाऱ्या.
कुठून तरी येणारा उदबत्तीचा दरवळ,
वळशावळशांनी गाभाऱ्यापर्यंत पोचविणारा.
सभोंवारच्या अंधारावर चढलेले गोड मौन.
आणि ती सतार ...

पंचप्राणांच्या स्पर्शानें होतात तिच्या तारा
पिवळ्याधमक बाभळींतून झरणाऱ्या चंद्रधारा.
तिच्या तरफा – गहनगूढ जलाशयावर
थरथरणारा वारा...

कोसळतात एकामागून एक
सोनेरी पावसाच्या थेंबांचे घोस
पाण्यांतून उफाळतात निळसर धुक्याच्या ज्वाळा.
सळसळून डंखायला येतात सुगंधी नागिणी
आणि चराचराचें होऊन जातें एक
रत्नखचित आकाश,
नादब्रह्मावर झेपावलेलें.

# भालचंद्र नेमाडे

## ३०. निरोप

ह्या विश्वभानाच्या घोंघावत्या समुद्रफेसात निरर्थक न ठरो
आपल्या आयुष्याच्या सुरम्य सप्तरंगी बुडबुडा, न ढळो
हे पहाटी पांघरलेले दाट झाडांतून डोकावणारे रोशन सूर्य

ह्या खिन्न विनाशतत्त्वाच्या झपाट्यात दरवळो
अकाली महामेघानं उठवलेली जमिनीतली उग्रगंधी धूळ, साचो
घर भरून जगण्याची समृद्ध अडगळ

बिलगण्याचे मार्ग अनेक असतात गडे, कुठून कसे एकत्र आले
अगम्य एकवटले आपले हे गुणसूत्रांचे परस्पराकर्षी मांसल बुधले
आयुष्यप्रवाहाला बिलगले एकमेकांत शिरून आंधळे डिंभथवे

संसाराच्या नटबोलटांनी रोजच्या पिळत्या सरकत्या
आपल्यातलं अंतर कमी करत आणलं. पुरुषप्रकृतीच्या
ह्या प्रचंड जनित्रानं आपल्या कुड्या विद्युत्भारित झाल्या

टोपलीतल्या अजगरासारखी सांभाळ आपली हिंस्र सुस्ती
घुसमटून उन्मादाच्या दलदलीत एकमेकांवर लडबडलो त्याची
आवळत राहिलो रात्रीची वाळू फेसाळत आपटून फुटलो त्याची

खोलवर जिरवत पाणी उभारले जैविक उमेठ उंच उंच
लांब पसरत राहिलो मऊ रेतीवर सुखानं ओसरत
नकळत दूर जात्या तारुण्याला अंतरत उतारवयावरून ओसंडत

घरकामाची अहोरात्र गाज सांभाळत तू आपलं हे तारू संथ ठेवलंस
न उसळता न खवळता उलटं होऊ दिलं नाहीस हे बुडबुड आयुष्य प्रिये,
आपण एकमेकांना द्यायचं काहीच बाकी ठेवलं नाहीय,
त्या एका जड थंड निरोपाशिवाय.

❑

मंगेश पाडगांवकर

# पाऊस

(कुमार गंधर्व यांस)

झाडे गद्गदा हलवणारा वनघोर पाऊस,
थेंबांचा अपार उत्सव मनस्वी पानापानातून,
फांद्यांच्या हिरव्या जत्रेत गरगरणारे बिलोरी पाळणे,
आत्मा पिसाऱ्याहून फुलवणारा मुक्त मनमोर पाऊस.

पाऊस अस्तित्वाचा कळण्याहून अपरंपार,
-अनादिमल्हार : कंठाला जन्म देणारा पाऊस,
वाटांचे आलाप क्षितिजाच्या समेवर कोसळताना
धुवांधार बरसणारा आनंदअनावर पाऊस.

हजार तंबोऱ्यांची षड्जगाज झोकणारा अवलिया पाऊस,
गोरखनाथाच्या हाकेसारखा अलखनिरंजन पाऊस :
हाक ऐकून नकळत उठून चालू लागतो आपण
दुर्लंघ्य पहाडापल्याडच्या निर्विकल्पात असा पाऊस.

मुंबई
२१–६–६८

## मोर

लयमग्न मोर. काळ्याभोर सावल्यांनी
हृदयाशी धरलेले. मोर घनश्याम.
मधूनच उमललेले उन्हाचे सोनसाळीक
हळुवार हुंगणारे मोर. पिसांची गाणी
डोहाच्या काठाशी सांडणारे नटराज मोर.
मोर रानभर आनंदनिळे. स्तब्ध शिल्पातल्या
अनावर चैतन्यासारखे मोर. अदृष्टातून वहाणारे
कृपेचे घननीळ झरे तसे मोर.

कुठून आले हे मोर ! काल नव्हते इथे.
किती एकाकी होते हे रान !
मेघांसाठी झाडांजवळ हाक नव्हती.
वारे वहात होते सवयीच्या गतीने.
डोहावर होते साचलेले कंटाळवाणे शेवाळ.

मोर आले. अचानक भरून भरून मोर आले.
झाडांनी अलगद झेलले हे निळे जादूगार.
मुक्या रानात नाचू लागले मोर :
लख्ख निळे उत्सव इथे...तिथे...सर्वत्र.
गर्द हाक घातली मोरांनी हृदयस्थ मेघांना.
अधिकच घननीळ होत गेले मोर :
सारे रान निळे गाणे करून टाकले मोरांनी.

मुंबई
१०–१०–६९

## प्रेम म्हणजे प्रेम असतं

प्रेम म्हणजे प्रेम म्हणजे प्रेम असतं,
तुमचं आणि आमचं अगदी 'सेम' असतं!

काय म्हणता? या ओळी चिल्लर वाटतात?
काव्याच्या दृष्टीने थिल्लर वाटतात?

असल्या तर असू दे,
फसल्या तर फसू दे!

तरीसुद्धा
तरीसुद्धा,

प्रेम म्हणजे प्रेम म्हणजे प्रेम असतं,
तुमचं आणि आमचं अगदी 'सेम' असतं!

मराठीतून इश्श म्हणून
प्रेम करता येतं;
उर्दूमधे इष्क म्हणून
प्रेम करता येतं;
व्याकरणात चुकलात तरी
प्रेम करता येतं;
कॉन्वेंटमधे शिकलात तरी
प्रेम करता येतं!

'लव्ह' हे त्याचंच दुसरं 'नेम' असतं,
प्रेम म्हणजे प्रेम म्हणजे प्रेम असतं,
तुमचं आणि आमचं अगदी 'सेम' असतं!



सोळा वर्षं सरली की
अंगात फुलं फुलू लागतात,
जागेपणी स्वप्नांचे
झोपाळे झुलू लागतात!

आठवतं ना?
तुमची माझी सोळा जेव्हा
रली होती,
डी सगळी पाण्याने
रली होती!

टांवर बेभान होऊन
चलो होतो,
..डीसकट बुडता बुडता
वाचलो होतो!

बुडलो असतो तरीसुद्धा चाललं असतं:
प्रेमानेच अलगद वर काढलं असतं!

तुम्हांला हे कळलं होतं,
मलासुद्धा कळलं होतं!

कारण
प्रेम म्हणजे प्रेम म्हणजे प्रेम असतं,
तुमचं आणि आमचं अगदी 'सेम' असतं!

प्रेमबीम झूट असतं
म्हणणारी माणसं भेटतात,
प्रेम म्हणजे स्तोम नुसतं
मानणारी माणसं भेटतात!

असाच एक जण
चक्क मला म्हणाला:
"आम्ही कधी बायकोला
फिरायला नेलं नाही!

पाच मुलं झाली तरी
प्रेमबीम कधीसुद्धा केलं नाही!
आमचं काही नडलं का?
प्रेमाशिवाय अडलं का?"

त्याला वाटलं मला पटलं!
तेव्हा मी इतकंच म्हटलं:

प्रेम म्हणजे प्रेम म्हणजे प्रेम असतं,
तुमचं आणि आमचं मात्र 'सेम' नसतं!!

तिच्या सोबत पावसात कधी
भिजला असाल जोडीने!
एक चॉक्लेट अर्धं अर्धं
खाल्लं असाल गोडीने!

भर दुपारी उन्हात कधी तिच्या सोबत
तासन्‌तास फिरला असाल!
झंकारलेल्या सर्वस्वाने
तिच्या कुशीत शिरला असाल!

प्रेम कधी रुसणं असतं,
डोळ्यांनीच हसणं असतं,
प्रेम कधी भांडतंसुद्धा
निळं चांदणं सांडतंसुद्धा!!

दोन ओळींची चिठीसुद्धा प्रेम असतं,
घट्ट घट्ट मिठीसुद्धा प्रेम असतं,
प्रेम म्हणजे प्रेम म्हणजे प्रेम असतं!!

## प्रेमात पडलं की

माझं काय, तुमचं काय,
प्रेमात पडलं की असंच व्हायचं!!

तिचं बोलणं,
तिचं हसणं;
जवळपास नसूनही
जवळ असणं;
जिवणीशी खेळ करीत
खोटं रुसणं;
अचानक स्वप्नात दिसणं!

खट्याळ पावसात
चिंब न्हायचं!
माझं काय, तुमचं काय,
प्रेमात पडलं की असंच व्हायचं!!

केसांची बट तिने
हळूच मागे सारली . . .
डावा हात होता
की उजवा हात होता?

आपण सारखं आठवतो,
प्रत्येक क्षण
मनात आपल्या साठवतो!

ती रुमाल विसरून गेली!
विसरून गेली की ठेवून गेली?

आपण सारखं आठवतो,
प्रत्येक क्षण
मनात आपल्या साठवतो!

आठवणींचं चांदणं असं
झेलून घ्यायचं!
माझं काय, तुमचं काय,
प्रेमात पडलं की असंच व्हायचं!!

तिची वाट बघत आपण उभे असतो . . .
ठरलेली वेळ कधीच टळलेली!
येरझारा घालणंसुद्धा
शक्य नसतं रस्त्यावर!
सगळ्यांची नजर असते
आपल्यावरच खिळलेली!!

माणसं येतात,
माणसं जातात,
आपल्याकडे संशयाने
रोखून बघतात!

उभे असतो आपण
आपले मोजीत श्वास :
एक तास! चक्क अगदी एक तास!!

अशी आपली तपश्चर्या
आपलं त्राण तगवते!
अखेर ती उगवते!!

इतकी सहज! इतकी शांत!
चलबिचल मुळीच नाही!
ठरलेल्या वेळेआधीच
आली होती जशी काही!!

मग तिचा मंजूळ प्रश्न :
"अय्या! तुम्ही आलात पण?"
आणि आपलं गोड उत्तर :
"नुकताच ग! तुझ्याआधी काही क्षण!"

काळावर मात अशी!
तिच्यासोबत भुलत जायचं!
माझं काय, तुमचं काय,
प्रेमात पडलं की असंच व्हायचं!!

एकच वचन
कितीदा देतो आपण!
एकच शपथ
कितीदा घेतो आपण!

तरीसुद्धा आपले शब्द
प्रत्येक वेळी नवे असतात!
पुन्हा पुन्हा येऊनही
पुन्हा पुन्हा हवे असतांत!!

साधंसुधं बोलताना
ती उगीच लाजू लागते,
फुलांची नाजूक गत
आपल्या मनात वाजू लागते!!

उत्सुक उत्सुक सरींनी
आभाळ आपल्या मनावर झरून जातं;
भिजलेल्या मातीसारखं
आपलं असणं सुगंधाने भरून जातं!!

भरलेल्या ढगासारखं
मनाचं भरलेपण उधळून द्यायचं!
माझं काय, तुमचं काय,
प्रेमात पडलं की असंच व्हायचं!!

# विंदा करंदीकर

## मासा : एक स्वरचित्र

मासा, रविशंकरच्या सतारीचा;
माशासारखा, माशाहून.
त्याचा तो ओंकारनेत्र, डबडबलेला.
तारांगण तारांचें पाण्यामधून पाहणारा,
शीलवान चंपकांनी निबिड वेढलेल्या
गंधारगूढ डोहांत पाण्याहून पोहणारा,
महाप्रवाहाच्या सोनेरी झंझावातांतून
समधात होत होत समेंत सामावणारा,
समेहून.
मासा, विचल वलयांच्या लयींत फिरणारा,
विरूपाक्ष, गमकगात्र, मत्स्यावतारी;
सरहद्दी धुंडणारा; खडकावर धडकणारा;
कांठावर आपटून काळजांत कोसळणारा;
कळवळणारा, काळजाहून.
मासा, अमावस्येला मनांत येणाऱ्या
चंद्रकोरीसारखा.
त्याची भींड, ऊर्वशीच्या भुवयीसारखी,
भुवयीहून:
गाफील इंद्रियांना फिरंगी मुलखांत
लुबाडून नेणारी, लयलवचिक मींड;
मींड अवेगनग्न, भग्नभोगी,
स्तनांमधून सलत जाणाऱ्या कांठासारखी,
कांठाहून.
मासा, खर्जात पोहणारा खर्जाहून,
आसमुद्रपर्यंतात, आसन्नप्रणव;
पर्यायान्तक; प्रलयानुसारी;
परार्धात् परार्धात् परार्धाहून;
मासा रविशंकराचा शंकराहून;
माशासारखा, माशाहून;
त्याचा ओंकारनेत्र, डबडबलेला.

साधना : १९६२

## झपताल

ओचे बांधून पहांट उठते...तेव्हांपासून झपाझपा वावरत असतेस.
...कुरकुरणाऱ्या पाळण्यामधून दोन डोळे उमलूं लागतात;
आणि मग इवल्या इवल्या मोदकमुठींतून तुझ्या स्तनांवर
बाळसें चढतें. उभें नेसून वावरत असतेस. तुझ्या पोतेऱ्यानें
म्हातारी चूल पुन्हां एकदां लाल होते. आणि नंतर
उगवता सूर्य दोरीवरील तीन मुतेलें वाळवूं लागतो;
म्हणून तो तुला हवा असतो ! मधूनमधून तुझ्या पायांमधें
माझीं स्वप्नें मांजरासारखीं लुडबुडत असतात; त्यांची मान
चिमटींत धरून तूं त्यांना बाजूला करतेस. तरी पण
चिऊकाऊच्या मंमंमधील एक उरलेला घास त्यांनाही मिळतो.
तूं घरभर भिरभिरत असतेस; लहान-मोठ्या वस्तूंमध्यें
तुझीं प्रतिबिंबें रेंगाळत असतात...स्वागतासाठीं 'सुहासिनी' असतेस;
वाढतांना 'यक्षिणी' असतेस; भरवतांना 'पक्षिणी' असतेस;
साठवतांना 'संहिता' असतेस; भविष्याकरतां 'स्वप्नसती' असतेस.
...संसाराच्या दहाफुटी खोलींत दिवसाच्या चौवीस मात्रा
चपखल बसवणारी तुझी किमया मला अजूनही समजलेली नाहीं.

मुंबई, ३०-८-५७

## दादरा

अंग पिणारे डोळे रंगाच्या मस्तीला शरण जातात,
हिवाळ्यांत. डाळिंबीच्या डहाळीवरचा अनोखा पक्षी
उडतांना फुलतो, गैशाच्या गालावरील पंख्यासारखा.
अशा वेळीं दादऱ्यांत मिसळून तुला पितात,
ते माझे ओठ सहा मात्रेचे असतात.
अवेळ झाल्याशिवाय क्षण येत नाहीं; मग वासना
गंधगूढ होते. बेशुद्ध झालेला तुझा खालचा ओठ
माझ्या आकाशांत मावत नाहीं; आणि हिवाळा मोर होऊन
नाचूं लागतो, तुझ्या जिवणीच्या जास्वंदीखालीं.
तेव्हां डोळे मोरपिसे बनतात; तुझा अंधार स्तनाकार असतो;
त्याला ओंजळींत पुंजावणारे तीर्थंकर हात माझे असतात;
तो माझा एकान्त सहा मात्रेचा असतो;
वसंत वृषभासारखा हिंवाळ्याला झुंगीत येतो;
फुलांनाही तुंबलेपणाचें अवसान असतें; पाकळीपाकळीला
असह्य क्षणाचा वास असतो; जेव्हां तुझे
पृथ्वीला गिळणारे नितंब हिरवळीवर हिल्लोळतात...
तुझ्या अभोगीला दादऱ्याची दर्दमिठी हवी असते.

मुंबई, १९५७

## २४. प्रेम करावें असें, परंतू...

हिरवे हिरवे माळ मोकळे;
ढवळ्या ढवळ्या त्यावर गाई;
प्रेम करावें अशा ठिकाणीं
विसरुनि भीती विसरुनि घाई.

प्रेम करावें रक्तामधलें;
प्रेम करावें शुद्ध, पशूसम;
शतजन्मांच्या अवसानानें
रक्तामधली गाठावी सम.

प्रेम करावें मुकें, अनामिक;
प्रेम करावें होउनियां तृण;
प्रेम करावें असें, परंतू...
प्रेम करावें हें कळल्याविण.

बेळगांव, १९.७.५२

## ४३. मुक्तीमधलें मोल हरवलें

मुक्तीमधलें मोल हरवलें;
जेव्हां केलिस
गोकुळांतली पहिली चोरी.
मिसळलास तूं काजळ-काळा
आणि गढुळलें मी हिम-गोरी

तुझ्या कृपेचें कृपाण प्यालें
कमळ होउनी; मधुर-डंखसें.
अन् भिजलेल्या पदरामधुनी
गंध सांडला तमपुष्पाचा
तुझ्या अधाशी उग्र नखांवर.

तेव्हांपासुन साठवतें मी
आठवणींच्या परडीमध्यें,
भरदार तुझ्या
छातीवरचें कुरळें पौरुष,
दंडामधील दणकट आशा,
भुवयीच्या त्या दटावणीसह.

मुक्तीमधलें मोल हरवलें
यमुनातीरीं;
शब्द हरवलें, बनले मोनी,
तेव्हांपासुन, तेव्हांपासुन
साठवतें मी आठवणींतच
गोकुळांतलें दहि-दुध-लोणी.

मुंबई, ऑगस्ट, १९५४

# कुसुमाग्रज

## कलोजस

तो व्ही. टी. वर असतो
तेव्हा कोणीच नसतो,
अस्तित्वाच्या फांदीला लोंबणारा
चुरगळलेल्या मांसाचा
कंटाळलेल्या अस्थींचा
एक सांगाडा घामेजलेला,
गर्दीची गती अंगावर घेऊन
वहात जातो निर्जीवपणाने
कुल्र्याकडे,
सांडपाण्यातील किडयासारखा,
व्यक्तित्वहीन.
पण कुर्ल्यातील सिंगल रूममध्ये येऊन
चटईवर, चौपाईवर मरून
तो जेव्हा पुन्हा उठून बसतो
दिवेलागणीच्या प्रकाशात,
तेव्हा तो झालेला असतो
एक प्रचंड कलोजस
बाप
भाऊ
नवरा ...
पेटलेल्या चुलीचा स्वामी,
छताला टांगलेल्या दिव्याचा
रखवालदार,
अस्तित्वाचे अठरा लगाम
सांभाळणारा,
अठरा सोनेरी अश्वांच्या पाठीवर
आसूड ओढीत
आपल्या ग्रहमालेचा परिवार
जीवनाच्या अंतराळात
मिरवीत नेणारा एक
साक्षात सूर्यनारायण !

## भीती

आपण काही काल असतो
आणि नंतर
अनंत काल नसतो
एवढं एकच खरं.
हे अस्तित्व
अल्पकालीन असलं तरी
लक्षावधी प्रकाशधारांनी
वैश्विक काळोखाला कापणारं,
सहस्त्र मुखांनी
अनुभूतीच्या प्रत्येक स्तनाग्राला
ओठ भिडवून त्यातील मैफल
अधाशीपणानं स्वतःत ओढणारं;
म्हणूनच नसण्याची कल्पना
दशदिशांत पल्लवलेल्या
आमच्या असण्याला सहन होत नाही.
म्हणूनच –
धर्म धर्मग्रंथ आणि प्रेषित
संत मवाली नेते ज्ञाते आणि सैनिक ...
सारे सारे जण
नास्तित्वाची भीती मालवण्यात
गुंतलेले.

## असीम

माझ्या खिडकीच्या तावदानापासून
आकाशगंगेतील
सर्वांत दूरच्या ताऱ्यापर्यन्तचे
हे असीम निरर्थक,
कालातीत दिशातीत
निरात्म कायद्यांनी जखडलेलं,
परिणत झालं नसतं
माणसाच्या जाणिवेत,
तर हे परमेश्वरा — परम निरर्थका —
दाराशी बसलेल्या त्या बैलासारखा
मीही राहिलो असतो
केवळ शारीर अस्तित्वाच्या
आल्हाददायक संतोषाच्या
डोहामध्ये डुंबलेला.
पण ते घडलं नाही
आणि म्हणून
या वैश्विक निरर्थकाच्या
एका अणुमात्र कोपऱ्यामध्ये
अर्थाची वसाहत
उभारण्याची जबाबदारी
माझ्यापुरती
शेवटी माझ्यावरच आहे.

## मी

सृष्टीतील सृजनशक्तीचा
मी आहे एक
खास उन्मेष,
जो पूर्वी कधी घडला नव्हता
सृष्टीच्या प्रारंभापर्यंत
आणि पुन्हा कधीही घडणार नाही
सृष्टीच्या अंतापर्यंत
असा एक खास मी !
माझं एक खाजगी आकाश असतं, माताजी,
ज्यात उगवतात चंद्र, सूर्य, तारे
तेही माझेच खाजगी, माताजी,
माझी एक खाजगी पृथ्वी असते
जिच्यावर वावरत असतं
माझं अस्तित्व
एकटं माताजी, अगदी एकटं;
तुम्हा लोकांना मी दिसतो ना, माताजी
तो मी नसतोच –
आणि तसाही नसतोच, माताजी.
तुम्हाला दिसतात त्या फक्त असतात
माझ्या रूपाचा अनुवाद करणाऱ्या
रंगीत चिंध्यांच्या बाहुल्या,
ज्या बनवलेल्या असतात तुम्हीच, माताजी,
स्वत:च्या समजुतीनं
आणि स्वत:च्या सोयीसाठी.
तात्पर्य माताजी,
माणूस आपल्यापर्यंत पोचतो
तो एका संबंधामधून,
पण त्या संबंधाच्या तुकड्याहून
तो केवढा तरी अफाट प्रचंड असतो.
खिडकीच्या काचेतून
उन्हाचा कवडसा आपल्या खोलीत पडतो, माताजी.
पण कवडसाच, माताजी,
सूर्य नव्हे.
हजारो कवडसे पडले तरी
आकाशातील ती ज्वलंत घटना
अनोळखीच राहते
आपल्या जाणिवांना !

( 'आनंद' नाटकातून )

## ४९. स्मरण

तुझ्या माझ्या दोन उल्का भेट झाली आकाशात
आठवते का ?

कालियाच्या श्वासापरी धुमसत होती रात
आठवते का ?

दोन विश्वे सांधणारी जाळणारी तेजोरेषा
आठवते का ?

उधाणून आल्या काही निराकार अभिलाषा
आठवते का ?

अंतरीच्या मौनाचेही निनादले प्रतिध्वनी
आठवते का ?

निमिषांच्या पंखावर निथळली संजीवनी
आठवते का ?

चार क्षण प्रवासात चार युगे सामावली
आठवते का ?

अबोधाच्या स्मरणाची दीपमाला उजळली
आठवते का ?

मीलनाच्या किनाऱ्याने वियोगाची चाले नौका
आठवते का ?



संयोगात ऐकू आल्या दुराव्याच्या क्रूर हाका
आठवते का ?

नियतीच्या गतीनेच आलो क्षितिजाच्या तळी
आठवते का ?

घडले ते गेले सारे राहुनिया अंतराळी
आठवते का ?

पृथ्वीवर आता झालो मातीमध्ये माती पण
आठवते का ?

मातीलाहि बिलगली आकाशाची आठवण
आठवते का ?

## ७७. चाक

रस्ता तुमचा
रथही तुमचा.
रथचक्राला बांधुन मी हा
धावत आहे
जोवर मी हे मानित आहे.
तोवर
तोवर
तोवर सारे
चक्राखाली चिरडत माझ्या
नभोगतांचे निळे पिसारे,
तोवर तुमच्या पथधूळीवर
मम रक्ताची
धार किनारे,
तोवर माझ्या अस्तित्वाचे
अपूर्व स्पंदन
सूर्यकुलातिल या गोलावर
चिरते आहे,
जोवर माझ्या उरात तुमच्या
चाक रथाचे फिरते आहे
तोवर...

## शासन

कोणाला शंका असेल
पण मला निश्चित माहीत आहे,
की माझे नाते
नऊ नक्षत्रांच्या मध्यावर
त्यांना आधार
आणि प्रकाश देत असलेल्या
त्या वैश्विक जाळाशी,
सूर्याशी
आहे –
पण केव्हा अंधारल्या घडीला
मीही विसरतो हे नाते
आणि उकिरड्याच्या कडेला बसलेल्या
भिकाऱ्याप्रमाणे
मी हातात कटोरा घेऊन बसतो
लज्जास्पद,
येत्या जात्या पांथस्थाच्या
अनुदानासाठी.
एखाद्या शेवाळलेल्या क्षणाला
मीही विसरतो ते नाते
आणि भुताटकी वाड्यातील
अमावास्या पीत बसलेल्या
विहिरीप्रमाणे
उबवीत बसतो अंतःकरणात
द्वेष मत्सराच्या हिरव्या सर्पांची
चिकट लगदाळी.
एखाद्या विसकटलेल्या दिवशी
मीही विसरतो ते नाते
आणि माझ्या अंगावर ओघळणाऱ्या
हलकटपणावर मात करण्यासाठी
होतो इतका हलकट
इतका
की माझ्या मुखावर चढतो
मी कधीही न मागितलेला
एक भयाण विद्रूप,
दुर्गंधी मुखवटा.
पण हे सारे सूर्यद्रोह
मी करीत असताना, केल्यावर,
माझ्या काळजाच्या आंतरदेशात
धगधगून
पेटून उठते एक विराट जंगल,
आणि प्रकाश न देणाऱ्या
नुसत्या रणरणीत धगीने
भाजून काढते मला
निःसंगपणाने.
हे असते सूर्याने केलेले शासन
आणि त्याने दिलेले आश्वासनही.

# सीमा

हा अंतस्थ संघर्ष
सहस्त्र सीमांचा –
प्रत्येक सीमा झुंज देत
मला आडवते
आणि अखेरी वाटही देते
पुढील सीमेपर्यंत जाण्यासाठी.
सर्व सीमांवर मात करीत
मी अखेर येऊन ठेपतो
एका निःसीम
वैश्विक शून्याच्या अंतराळात
जेथे माझ्या अस्तित्वाचा
आशय आणि आकारही
विरघळून जातो;
मग मी भयानक एकाकी, निरालंब
आणि भयभीत
पराभूत शरमिंदा होऊन
पुन्हा धावत जातो माघारी
माझ्या परिचित मातीतील
त्या सहस्त्र सीमांकडे
त्यांच्या संघर्षांकडे.

## राधा

त्रिकालाबाधित
पुरुषमनातील
युगयात्रिक
आकांक्षा.

नवथर अनभिज्ञ
वेणुवादनाच्या
पाकळ्या फुलविणारी
रसज्ञता.

त्रिकाळ पाणनागांच्या
प्रतिकारासाठी
किनाऱ्यावरील
प्रोत्साहन.

गौरवाच्या मस्तकी
मुकुट घालणारी
नेत्रातील नि:शब्द
भावारती.

जखमांचे रक्त
अस्मितेचे दहन
पापण्यांनी टिपणारी
संजीवनी.

प्रणयात मातृत्व
मिलाफलेला
पुरंध्र ओठांचा
स्पर्शोत्सव.

व्यभिचाराच्या
अदम्य आमंत्रक
साहसदेशातील
मुशाफरी.

## पुनव

असले मीलन–
मिळे न केवळ दोन त्वचांची
मांसल माती ॥

नसतो नुसता दीपोत्सव तो
झगमगणारा शरीरतेच्या
सौधावरती ॥

अशा मिठीतुन तनू तनूला
तनुत्व सारे अर्पण करते,
अवकाशातिल अपार्थिवाची
पुनव कार्तिकी
तनूत उरते ॥

## मनोगत

(एक प्रासंगिक)

आज हे कविसंमेलन
साजरं होत आहे
माझ्या अमृतमहोत्सवासाठी.
प्राकृत भाषेत—
माझ्या शहात्तराव्या वर्षासाठी.
सत्कार समाजोन्मुख सेवेचा व्हावा
असामान्य पराक्रमाचा व्हावा,
केवळ देवाच्या दयेनं
वा दुर्लक्षानं वाढत जाणाऱ्या
वयाचा होऊ नये,
हा माझा आग्रह.
पण सत्कार हे नारदासारखे चतुर
आणि इंद्रासारखे बहुरूपी असतात.
अनपेक्षित ठिकाणी
अनपेक्षित रूपात
ते आपल्यासमोर प्रगट होतात,
आणि आपणही
'अग अग म्हशी मला कुठे नेशी' म्हणत
त्यांना सामोरे जातो.
आजचा हा प्रसंग तसाच
नकारांच्या राशीतला
होकार शोधून काढणारा,



आणि तरीही
शब्दांचे कोट ओलांडून
काळजापर्यंत पोचणारा.

•

तर असा हा अमृतमहोत्सव
आपल्या वयावर शिक्कामोर्तब करणारा
लोकांसाठी
आणि आपल्यासाठीही.
देवलांचं पद आहे :
'म्हातारा इतुका न अवघे
पाऊणशे वयमान'
या वयात आलेले कवीही
तसंच म्हणतात
आणि वरती
'अभी तो मैं ज़वान हूं' अशी धमकीही
पोरीबाळींना देतात.
पण मी तसं करणार नाही
कारण ते कोणी खरं मानीतही नाही.

•

पण माझ्यापुढे प्रश्न आहे
पंच्यात्तरीला अमृतमहोत्सव
का म्हणतात ?

पंचविशीला रौप्य
पन्नाशीला सुवर्ण
आणि साठीला हीरक म्हणतात.
मूल्यवान वस्तूचे वास्तव
येथे संपतं
आणि आपण प्रवेश करतो
अमृत नावाच्या एका काल्पनिकात,
जे फक्त कवींच्या जगात
आणि तेही उपमेपुरतंच
अस्तित्वात आहे.
आम्ही कवींनी ही अमृत कल्पना
इतकी लोकप्रिय केली आहे
की प्रेयसीचे अधर,
संतांचे शब्द, सुरेल संगीत
इत्यादी नेहमीचे हक्कदार ओलांडून
ते थेट पोचलेलं आहे
गावगन्ना असलेल्या
अमृततुल्य टी हाऊसमधील
चहापर्यंत.

•

मित्रहो, अखेर माणसाचं आयुष्य म्हणजे
लक्षावधी संबंधांनी विणलेलं
जमिनीशी बांधलेलं एक जाळं.

वार्धक्य वाढत जातं
तसंतसं हे संबंधांचे तणाव
तुटायला लागतात,
आणि माणूस संदर्भहीन
म्हणूनच एकाकीही व्हायला लागतो,
संसाराच्या संगीत रागदारीतील
एक विसंवादी स्वर होतो,
वास्तवात राहूनही
अवास्तव होत जातो.
म्हणूनच वयाच्या या तळावर
त्याला अमृताची सोबत.
जे म्हटलं तर असतं
आणि कितीही म्हटलं
तरी अजिबात नसतं.
आणखीही
एक कारण संभवतं,
पंचात्तर वर्षांची सवलत देऊनही
जी माणसं मृत होत नाहीत
त्यांना अमृतात जमा करण्यावाचून
गत्यंतरच राहात नाही.

•

पण हे सर्व अलाहिदा.
आज मला सर्वस्वानं जाणवतो

तो चहूकडून
महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून
माझ्यावर कोसळणारा
प्रेमाचा पर्जन्य.
या पाणलोटी वर्षावात
मी उभा आहे
पानं झडून गेलेल्या झाडासारखा,
जे देऊ शकत नाही
आकाशाला फूल आणि भूमीला सावलीही.
निष्पर्ण फांद्यावरून पाझरत आहे
फक्त अगतिकता
आणि संकोच.
कारण
माझ्या आकाशातील
काळ्या जांभळ्या ढगांमध्ये
अमृताचे एवढे डोह साचलेले असतील
हे माझ्या अपेक्षेतच काय
पण कल्पनेतही नव्हतं.
शेवटी मित्रहो, झाड फांद्यांच्या द्वारा
पसरतं आपल्या भोवतालात
कोठल्या तरी आंतरिक ऊर्मीनं.
त्याप्रमाणे कविलेखकही
शब्दांच्या वसाहती बसवतात
स्वत:च्याच भावात्मक विस्ताराला
निवारा देण्यासाठी.

याहून जास्त
मीही काही केलेलं नाही.
पण जे केलं ते आपल्यासारख्या
असंख्य रसिकांनी आपलं मानलं,
मूठभर पोहे घेऊन
श्रीकृष्णाच्या हातांनी
आपल्या स्नेहाची सुवर्णनगरी
मला दिली—
याहून माझ्यासारख्या
शब्दयात्रेतील सामान्य वाटसरूचं
अधिक भाग्य ते कोणतं ?

●

तसे आम्ही सर्वच
शब्दांचे सौदागर,
शब्द कोठपर्यंत जातात
हे आम्हाला कळतं,
कोठे थांबतात हेही कळतं.
इथे ते थांबलेले आहेत.
म्हणूनच माझ्यावर
स्नेहवर्षाव करणाऱ्यांनो,
येथील तेथील आणि तेथीलही
हे नि:शब्द अभिवादन
आपणा सर्वांना.

●

## आकाशनील

मीलन लालसा तर
देहवान असतेच,
पण देहदेखील
आपण समजतो तितका
देहवान नसतो.
माणसाचं अपार्थिव चैतन्य
सृष्ट जीवनातून
ब्रह्मकमलासारखं उमललं,
तेव्हाच स्त्री-पुरुषप्रेमाला
विश्वातील परम सुंदराचं
सिंहासन लाभलं.
आपण ते विद्रूप करतो
त्याला जनावरी पातळीवर नेऊन,
पशूच्या कातडीत

अनात्म देहाचं विसर्जन करून.
पण हे मीलन
जर तसं नसेल
केवळ त्वचेशी बाधलेलं,
तर देहात उगवणारा
प्रत्येक स्पर्शही
देहातच विदेही होईल,
परस्परांच्या आंतरिक अस्तित्वात
एकात्म होण्यासाठी
आसावलेला.
हे एक अवकाशातील
नक्षत्राचं आकाशनील नातं
पृथ्वीच्या अपत्यांपर्यंत
पोचलेलं.

## सवाल हा आहे–

त्या दूरस्थ तारकांबद्दल
मी बोलतच नाही.
त्या तुमच्या मालकीच्या नाहीत.
हजारो प्रकाशवर्षे
दूर असलेल्या त्या ब्रह्मज्योती
केव्हा उगवतील
केव्हा मावळतील
मेघांच्या निबिड अरण्यात
केव्हा अदृश्यही होतील.

माझा सवाल आहे
तो तुमच्या मालकीच्या
तुमच्या खासगी आकाशातील
तारकांबद्दल.
त्या जर विझल्या असतील
तर त्या दूरस्थ तारकाच काय,
पण सहस्र सूर्यही
तुमच्या मार्गावर
अमावास्याच ओतीत राहतील.

## असह्य

माफ करा, पण
मला वाटते
अशा मुलींनी
(आणि मुलांनी)
मरून जावे !
अपार थकवा
पंखावरती
नसे विसावा
नाही प्रीती;
दरिद्रतेच्या
अपमानांनी
पदापदावर
पिचते छाती;
निरालंबते—
मधे नभाच्या
घरट्यावाचुनि
या पिल्लांनी
किती उडावे ?

फुरसत नाही
हसावयाला
रडावयाची
सवलत नाही,
जगावयाची
सक्ति परंतू
त्या जगण्याला
आशय नाही;
केवळ थकणे
शिणणे कण्हणे
अन्यायांच्या
तटात चिणणे,
असे मनाचे
लक्तर अवजड
या चिमण्यांनी
किती सहावे ?

## संध्या

उषा सुंदर होतीच
पण अधिक सुंदर आहे
ही संध्या.
मावळतीवर उतरलेला
हा सूर्य,
दिवसभराच्या प्रकाशदानाने
कृतार्थ झालेला
अधिक प्रकाशमय अधिक स्नेहशीलही.
निर्वाहासाठी
आकाशात प्रवेशणाऱ्या
क्षुधित पाखरांपेक्षा
तृप्त संतोषाने जंगलाकडे
परतणारी ही पाखरे
अधिक आनंदमय.
आणि मी – माझे अस्तित्व
प्रकाशात प्रवेश करताना
पूर्ण निराशय असलेले,
आता अंधारात विश्रांत होताना
सर्वंकष आशयाने
शिगोशिग भरलेले.
असण्याचे उन्नयन जगण्यात करणारी
ही संध्या.

## जमाव

विवेकशून्य द्वेषाची
घाऊक खरेदी करणारा,
पिसाट घोषणांच्या पलित्यांनी
आसमंत पेटविणारा
जेव्हा रस्त्याने धावू लागतो,
तेव्हा तो असतो
एक प्रचंड डोंगरकाय डायनोसार
उत्क्रांतीच्या इतिहासातील
निरात्म देहावस्था दर्शविणारा
जमाव –
व्यक्तिगत जाणिवांचे विसर्जन
समूहाच्या अश्वशक्तीत करणारा,
क्रीडाशील सहजतेने
निरागस माणसांच्या माना चिरणारा,
बलात्कारित शरीरांचे अवशेष
कचऱ्याच्या कुंड्यांत फेकणारा,
माना लववून बसलेले मोहल्ले
मुलाबाळांसह जाळणारा,
दुबळ्यांच्या भेकड कत्तलीवर
वीरतेचा शेंदूर फासणारा,
शेकडो शतकांत आकारलेला
संस्कृतीचा सत्त्वगर्भ
पायदळी तुडविणारा,
जमाव –
पण जेव्हा कोणी परमपुरुष
सहस्ररश्मी सूर्याचा सामंत
डायनोसारच्या विक्राळ सुळ्यांना
आणि राक्षसी पंजांना आव्हान देत
उभा राहतो स्फटिकाच्या पहाडासारखा
आभाळभर

आणि उद्‌घोषित करतो महामंत्र
मेघमालेच्या स्वरात :
'अद्वेष्टा सर्वभूतानाम्,
मैत्रः करुण एव च'
तेव्हा
त्या समुदायाच्या सागरातील
प्रत्येक थेंब अलग होतो
थरथरतो
लखलखतो
ईश्वरीय सांद्र स्पर्शाने,
आणि त्या वेताळबाजाराचे
रूपांतर होते देवदूतांच्या संमेलनात,
सिद्ध होते त्यातून अभेद्य नरसिंहशक्ती
अमंगलाच्या संहारासाठी
शिवसुंदराच्या परित्राणासाठी,
स्तब्ध झालेल्या पृथ्वीचा गोल
पुन्हा गतिमान होतो तेव्हा
सूर्याच्या दिशेने
पण –
दानवीकरण घडते वारंवारतेने
देवदूतीकरणासाठी मात्र
करावी लागते प्रतीक्षा दीर्घकाल
त्या एका आश्वासनावर
भिस्त ठेवून –
''संभवामि युगे युगे.''

## उगवतीचं ऊन

उगवतीचे ऊन आता
मावळतीला पोचले आहे
मार्गक्रमण मार्गापेक्षा
स्मरणात अधिक साचले आहे.

तक्रार नाही, खंत नाही,
पूर्तीसाठीच प्रवास असतो
केव्हातरी मिटण्यासाठीच
काळजामधला श्वास असतो.

वाट केव्हा वैरीण झाली
तरी वृक्ष प्रेमळ होते
साती रंग भेटून गेले
निळाईशी जडले नाते.

काळोखलेल्या गुहेतदेखील
धडपडणारे किरण होते
देवळांमधल्या दिव्यांनाही
स्नेहाभावी मरण होते.



वाजत गाजत वरात आता
वेशीपाशी आली आहे
जिव्हाळ्याच्या चिता पेटवीत
बरीच पायपीट झाली आहे

माथ्यावरचा आभाळबाबा
सवाल आता पुसत नाही
पृथ्वी झाली पावलापुरती
अल्याड पल्याड दिसत नाही

## ४. मौन

शब्द – जीवनाची अपत्ये –
मृत्यूपर्यंत पोहोचत नाहीत
म्हणून तुझ्या समाधीवर
मी वाहत आहे
        माझे मौन

मृत्यूसारखेच अथांग
अस्पष्ट अनाकार,
सारे आकाश व्यापून
अज्ञानाच्या प्रदेशाकडे
प्रवाहात जाणाऱ्या
स्वरहीन संथ मेघमालेचे
        मौन.

# ४९. स्वधर्म

दिवसाचा गुण प्रकाश आहे
रात्रीचा गुण श्यामलता
गुण गगनाचा निराकारता
मेघांचा गुण व्याकुलता

श्रेयस्कर ते असो नसो वा
निजधर्माविण नाहि गती
कैद चराचर अपुल्या ठायी
त्यात मुक्तता त्यात रती.

सांगशील का कधी धरेला
वहात जा तू जलापरी
धगधगत्या बिजलीस बसाया
दवाप्रमाणे फुलावरी ?

तसेच मीपण आहे माझे
तयासारखे तेच असे
अपार काळामधे बनावट
एकाची दुसऱ्यास नसे.

अभेद्य असले अजिंक्य असले
भलेबुरे पण तुटेल का ?
तुटल्यावरती आणिक काही
शून्यावाचूनि उरेल का ?

## २४. बाजीराव

(एक मनोगत)

तुफानाच्या मंदिरात
आपण दोघांनी बांधली आहे पूजा
तुफानाच्या उपासकांना
या संसारात आहे सजा
जन्मभर अशांतीची.

तुफानाचा वरदहस्त
माथ्यावरती पडल्यावर
वाट गवसत नाही कधीही
विश्रांतीची.

तृणाच्या हिरव्या लकेरींनी
फुलून येत नाही कधी
आपल्या जीवनाचा किनारा,
जीर्ण वडातील भुताटकीचा
प्रवाहात पाय टाकून
तीरावर बसला आहे पहारा
— कायमचा.

उलगडत नाही आपल्या अंधारावर
स्निग्ध सोनेरी रेशीम
समईतील किरणांचे,
विक्राळ मेघांच्या द्वंद्वांतून
उन्मत्त विजांच्या धारा
उधळतात आपल्या रस्त्यावर
भरव तराणे
मरणांचे.

वाहात नाही आपल्यासाठी नदी
पहाटच्या पलंगावरील
रतितुष्ट पुरंध्रीसारखी
प्रसन्न नम्र लाघवी,
गर्जत आहेत लक्ष लाटा सागरांतील
गरुडाने घायाळ केलेल्या नागिणींसारख्या
उफाळलेल्या
माहुताला मारून
पळत सुटलेल्या हत्तिणींसारख्या
पिसाळलेल्या.

उघडत नाहीत आपल्यासाठी
सुगंधाने निथळलेल्या
— प्रकाशाने उजळलेल्या
आरस्पानी महालांची कवाडे,
पायांतील साखळदंड ओढीत
आपण धावतो आहोत दोघे
अखंड

मृत्यूच्या क्षितिजाकडे.

# वसंत बापट

**Vasant Bapat**

१

तशा सगळ्याच कविता तुझ्यामुळे आणि तुझ्यासाठी.
अस्तित्वच जर तू भारलेले
तर काय नवल
सगळेच शब्द तू गर्भारलेले.

या साऱ्या कविता तर तुझ्याच.
काही गाणी : तुझ्या कानात गुणगुणण्यासाठी.
काही : तुलाच उमगणाऱ्या हाका.
काही : टाहो
वैराणात फुटून वैराणात विरून जाणारा.
आणि बहुधा या शेवटच्या कैफियती.

माफ कर शब्दांना, तू अस्वस्थ झालीस तर.
माफ कर शक्य तर मलाही.
तुझ्या हसऱ्या डोळ्यांच्या काठांजवळ
एक अश्रू उभा राहिला तर, त्याला माफ कर.

मोरपिसासारखी दोन बोटे डोळ्यांवर फिरवून
ती माझ्यापुढं नाचवित, एकदा तू म्हणालीस,
एक बोट धर पाहू
मी विचारले, का ? कशासाठी ?
तू म्हणालीस, मुकाट्यानं धर आधी
सुलताना रझियाच्या गुलामाच्या अदबीनं
मी तुझं बोट धरलं
बोट सोडवून घेतलंस आणि टाळी वाजवलीस
तेव्हा मात्र मी दचकलो
हा तर शिरच्छेदाचा संकेत
माझे भय कधी खोटे बोलत नाही
तू म्हणालीस, बिचारा तू
न धरलेल्या बोटावर तुझं नाव होतं.

वसंत बापट

नारायण सुर्वे

**Narayan Surve**

# कार्ल मार्क्स

माझ्या पहिल्या संपातच
मार्क्स मला असा भेटला

मिरवणुकीच्या मध्यभागी
माझ्या खांद्यावर त्याचा बॅनर होता.
जानकी अक्का म्हणाली, 'वळिखलंस ह्याला –
ह्यो आमचा मार्कसबाबा
जर्मनीत जलमला, पोताभर ग्रंथ लिवले
आणि इंग्लंडच्या मातीला मिळाला.
संन्याशाला काय बाबा
सगळीकडची भूमी सारखीच
तुझ्यासारखी त्यालाही चार कच्चीबच्ची होती.'
माझ्या पहिल्या संपातच
मार्क्स मला असा भेटला

पुढे : एका सभेत मी बोलत होतो,
– तर या मंदीचे कारण काय?
दारिद्र्याचे गोत्र काय?
पुन्हा मार्क्स पुढे आला; मी सांगतो म्हणाला,
आणि घडाघडा बोलतच गेला.

परवा एका गेटसभेत भाषण ऐकत उभा होता.
मी म्हणालो –
'आता इतिहासाचे नायक आपणच आहोत,
यापुढच्या सर्वच चरित्रांचेही.'
तेव्हा मोठ्याने टाळी त्यानेच वाजविली
खळखळून हसत, पुढे येत;
खांद्यावर हात ठेवीत म्हणाला,
'अरे कविता-बिविता लिहितोस की काय?
छान, छान.
मलासुद्धा गटे आवडायचा.'

# विंदा करंदीकर यांच्या ज्ञानपीठ पुरस्कार समारंभ भाषणामधील काही भाग

यांप्रसंगी माझा जीवनाकडे व काव्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन सामान्यत: कसा आहे, हे थोडक्यात सांगणे कदाचित औचित्यपूर्ण ठरेल. काव्याने जीवनाशी समकक्ष होण्याचा प्रयत्न केला पाहिजे, असे मी मानतो. मानवी अवस्थेत अंतर्भूत असलेल्या विविधतेचा व संमिश्रतेचा काव्याने वेध घेतला पाहिजे.

मानवी अवस्था म्हणजे स्थूल राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक घडामोडी नव्हेत, तर त्यांचे मानवी मनात उठणारे धूसर तरंग व अंधुक प्रतिबिंबे होत जी माणसांच्या विचारांनी, भावनांनी, कल्पनाशक्तीने व लैंगिक प्रेरणांनी संस्कारित झालेली असतात. संपूर्ण मानवी जीवन हे कोणत्याही एका सिद्धान्ताने किंवा तत्वप्रणालीच्या साहाय्याने पूर्णत: समजू शकत नाही. मानवी जीवन हे प्रत्येक सिद्धांतातील सत्यांग व मिथ्यांश उघड करीत जाते. मानवी जीवन हे सर्व सिद्धान्ताच्या पलीकडे झेपावते. ज्या कवीला जीवनातील विविधतेचा व व्याभिश्रतेचा वेध घ्यायचा असेल, त्याला काव्याविषयीचा खुला दृष्टिकोन स्वीकारल्याशिवाय गत्यंतर नाही. काव्याविषयीचा खुला दृष्टिकोन हा निरनिराळ्या भावना, घाट व शैल्या यांची शक्यता गृहीत धरतो. तो दृष्टिकोन विशुद्धतेचा संबंध विशिष्ट भावस्थितींशी जोडीत नाही किंवा सौंदर्याचा संबंध घाटाच्या विशिष्ट गुणधर्माशी जोडीत नाही. पारंपरिक घाटांना व पद्धतींना तो कमी लेखित नाही आणि प्रयोग करण्याच्या उत्साहात नेहमीच्या अनुभवांना मूलत: काव्यहीन समजत नाही. योग्य संदर्भात तो दृष्टिकोन कुरुपता, घाण, क्रौर्य व ग्राम्यता यांचा स्वीकार करतो; पण मी त्यांना नव्या दैवतांचे स्थान देत नाही. परिणामत: तो अनुभवातील व तंत्रातील विविधतेचा स्वीकार करतो. खुला दृष्टिकोन स्वीकारणारा कवि जीवनाविषयीच्या किंवा काव्याविषयीच्या कोणत्याही विशिष्ट सिद्धान्ताला आपल्या सृजनशक्तीवर स्वार होऊ देत नाही. मी हा काव्यविषयीचा खुला दृष्टिकोन स्वीकारतो. त्यामुळे माझ्या काव्यात परस्परविरोधी भावना, विचार व सौंदर्यात्मक दृष्टिकोन प्रगत होताना आढळतात. त्यामध्ये वास्तवता व कल्पकता, सामाजिक वास्तवाविषयीचे मार्क्सवादी विचार, आणि फ्राइडवादी लैंगिक प्रेरणा, उपहासात्मक उद्‌गार आणि अतींद्रियीचा गूढवादी वेध, पारंपरिक पद्धती आणि नवे प्रयोग, या सर्वांचा समावेश होतो; पण हा काव्यविषयक दृष्टिकोन हा माझ्या विशिष्ट निर्मितीशी संलग्न असल्यामुळे कदाचित तो इतर कवींना गैरसोयीचा वाटण्याचीही शक्यता आहे.

मी साहित्य ही एक 'जीवनवेधी' कला आहे, असे मानतो. 'जीवनवेधी' म्हणजे 'जीवनाविषयी असलेली' साहित्याने जीवनाशी समकक्ष होण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्याने मानवी जीवनातील विविधतेचा, व्यामिश्रतेचा व गतिशीलतेचा वेध घेतला पाहिजे. मी सर्व सिद्धांतावर आक्षेप घेतो. जीवनाचा अगर कलेचा गतिशील प्रवाह प्रत्येक सिद्धांतातील सत्यांश व मिथ्यांश उघड करीत जातो. मी जीवनाविषयीच्या, कलेविषयीच्या व साहित्यविषयीच्या खुल्या दृष्टिकोनाचा पुरस्कार करतो; पण माझ्यावर इतरांवर प्रभाव पडला नाही, असे नव्हे. मी इंग्रजीचा प्राध्यापक असल्यामुळे माझ्या काव्यावर बाऊझिंग, हॉपकिन्स व टी. एस. इलिअट यांचा प्रभाव पडला. माझ्यावर प्रभाव पाडणारे मराठी कवी म्हणजे केशवसुत, माधव ज्यूलियन, व मर्ढेकर, मार्क्सवाद व गांधीवाद, सेलचा संशयवाद व भारतीय गूढवाद यांच्या प्रभावामुळे माझ्या काव्यातील विचारांना आंतर्विरोध निर्माण झाले आहेत. ज्यांचा सुसंगत सिद्धांतावर विश्वास आहे. त्यांच्या दृष्टीने मी फार गैरसोयीचा कवी आहे.

माझा विश्वास विज्ञानावर आहे, धर्मावर नाही. फार पूर्वी 'ज्ञान ही एक शक्ती आहे' असे बेकन म्हणाला होता; पण मी ज्ञानाला फक्त एक शक्ती मानीत नाही, तर मानवाचा खराखुरा मुक्तिदाता मानतो; पण मला अभिप्रेत असलेले ज्ञान हे निव्वळ बाह्य जगाचे ज्ञान नव्हे, तर माणसाच्या आतील जगाचे ज्ञान आणि माणसाने निर्माण केलेल्या समाजाचे ज्ञान होय. म्हणून फॉईड किंवा मार्क्स, लिंकन किंवा गांधी हेही डार्विन किंवा आइस्टाईन यांच्या इतकेच माणसाचे मुक्तिदाते ठरतात. जिथे वंश, धर्म आणि राष्ट्रीयता यांचे भेद नाहिसे होऊन त्या ठिकाणी माणसात फक्त सामान्य बंधुभाव असेल, जिथे माणसांच्या सर्व मूलभूत गरजा भागवल्या जातील, जिथे अंधश्रद्धा, आर्थिक पिळवणूक आणि अतिरेकी लोकसंख्या यांचा अभाव असेल, आणि जिथे शिक्षण, वैद्यकीय मदत आणि सुसंस्कृतता या गोष्टी सामान्य माणसींच्या आवाक्यात असतील, असे जग आपणास निर्माण करावयाचे असल्यास आपल्याला विज्ञानाचाच उपयोग करावा लागेल. ही क्रांती घडवून आणण्यात विज्ञानाला केंद्रीय स्थान प्राप्त झालेले दिसेल. विज्ञान नव्या मानवाची निर्मिती करील.

मला दिसणारा नवा मानव हा संपूर्ण जगाचाच नागरिक असेल, तो रंग, वंश, धर्म, लिंग किंवा राष्ट्रीयता हे भेद मानणारा नसेल, तो मानव जातीचे ऐक्य व बंधुत्व यांचा पुरस्कार करील तों स्वातंत्र्य, समता, आणि सामाजिक न्याय या गोष्टींना मूलभूत मूल्ये मानील आणि तो सुसंस्कृत जीवनात आर्थिक पिळवणूक, राजकीय दडपशाही, अतिरिक्त लोकसंख्या आणि युद्धे यांना स्थान नाही असे मानील. तो स्वत: शिस्तबद्ध व संहिष्णू असेल आणि खेळ, शिक्षण, सुसंस्कृता व बौद्धिक कार्य या क्षेत्रातच स्पर्धा करणारा असेल. एखादा धार्मिक माणसाला परलोकाबद्दल जितके प्रेम व आदर वाटतो, तितकेच प्रेम व आदर त्याला इहलोकातील जीवनाविषयी वाटेल आणिं अधूनमधून धक्के मिळत असले, तरी तो निर्ढावलेला आशावादी असेल.



*(१० ऑगस्ट दिल्लीत केलेल्या इंग्रजी भाषणाचा विंदां करंदीकरांनी केलेला मराठी अनुवाद)*

[www.shaileshdeshpande.in](http://www.shaileshdeshpande.in)